रायगड, नवी मुंबई
# रामप्रहर
◆ वर्ष १९ ◆ अंक ७०
www.ramprahar.com
◆ रविवार, २७ सप्टेंबर २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

अंतरंग

आंतरराष्ट्रीय पर्यटकांचा विसर्जनात सहभाग/२
पनवेलमध्ये गणरायांना भावपूर्ण निरोप/३
`सीकेटी'चे स्पर्धक बॉक्सिंग स्पर्धेत चमकले/८

## एसआयआरबाबत दावे-हरकतींसाठी १२ ऑक्टोबरपर्यंत मुदतवाढ



**मुंबई :** निवडणूक आयोगाने महाराष्ट्रातील विशेष सखोल मतदार यादी पुनरिक्षण प्रक्रियेतील दावे-हरकतींसाठीची मुदत १२ ऑक्टोबरपर्यंत वाढवली आहे. नोटिसांवरील निर्णयाची मुदत १० नोव्हेंबरपर्यंत वाढवण्यात आली. दिल्लीसाठी दावे-हरकतींची मुदत ३० ऑक्टोबर, तर निर्णयाची मुदत ३० नोव्हेंबर आहे. शनिवारी झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. अनमॅप्ड किंवा तार्किक विसंगती असलेल्या मतदारांना नोटीस दिल्यास बूथस्तरीय अधिकारी घरी जाऊन कागदपत्रे घेतील. ती ऑनलाइन अपलोड करून निवडणूक नोंदणी अधिकाऱ्याकडे पाठवली जातील. अशा मतदारांना कार्यालयात सुनावणीसाठी वारंवार बोलावले जाणार नाही. अपवादात्मक स्थितीत अधिकाऱ्यांच्या निर्णयानुसार ऑनलाइन सुनावणी होईल. कुटुंबातील कोणत्याही प्रौढ सदस्याला सुनावणीसाठी अधिकृत करता येईल. ऑनलाइन सुविधाही वाढवणार आहेत.

# महाराष्ट्रात दुष्काळ जाहीर


## महायुती सरकारचा निर्णय; शेतकऱ्यांना दिलासा

**मुंबई : प्रतिनिधी**

पावसाने ओढ दिल्याने राज्यातील शेतकरी अडचणीत सापडला असताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारने शेतकऱ्यांच्या हिताचा ऐतिहासिक आणि धाडसी निर्णय घेतला आहे. राज्यातील ३५८ पैकी २६५ तालुक्यांमध्ये 'ट्रिगर-१' लागू झाल्याने या सर्व तालुक्यांत कोरडा दुष्काळ जाहीर करण्यात आला आहे. संकटाच्या काळात शेतकऱ्याला वाऱ्यावर न सोडता त्याच्या पाठीशी ठामपणे उभे राहण्याची सरकारची भूमिका या निर्णयातून पुन्हा एकदा स्पष्ट झाली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वतः दुष्काळी परिस्थितीचा सखोल आढावा घेतला. पावसाच्या दीर्घ खंडामुळे खरीप पिकांचे मोठे नुकसान झाले असून अनेक भागांत पाणी आणि चाऱ्याची समस्या निर्माण झाली होती. केवळ मंत्रालयात बसून निर्णय न घेता फडणवीस यांनी प्रत्यक्ष दुष्काळी भागांचा दौरा केला, शेतकऱ्यांशी संवाद साधला, स्थानिक प्रशासनाकडून वस्तुस्थिती जाणून घेतली आणि त्यानंतर युद्धपातळीवर दुष्काळ जाहीर करण्याची प्रक्रिया पूर्ण केली. शेतकऱ्यांप्रति असलेली संवेदनशीलता आणि निर्णयक्षम नेतृत्व याचा हा उत्तम नमुना मानला जात आहे.

दुष्काळ जाहीर झालेल्या भागांतील शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी सरकारने सवलतींचे मोठे पॅकेज जाहीर केले आहे. जमीन महसुलात पूर्ण सूट देण्यात येणार असून पीक कर्जाचे पुनर्गठन केले जाणार आहे. शेतीशी निगडित कर्जाच्या वसुलीला स्थगिती देण्यात आली आहे. त्यामुळे अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्याला कर्जाच्या हप्त्याची चिंता न करता पुढील हंगामाचे नियोजन करता येणार आहे. वीज बिलाबाबतही सरकारने मोठा दिलासा दिला आहे. ७.५ अश्वशक्तीपर्यंतच्या कृषीपंपांचे वीजबिल यापूर्वीच माफ करण्याचा क्रांतिकारी निर्णय फडणवीस सरकारने घेतला होता. आता त्यापेक्षा अधिक क्षमतेच्या कृषीपंपांच्या चालू वीजबिलातही सवलत देण्यात येणार आहे.



दुष्काळ जाहीर केलेल्या गावांमध्ये शेतकऱ्यांच्या शेतीपंपांची वीजजोडणी खंडित केली जाणार नाही, अशी ग्वाही सरकारने दिली आहे. भाजप सरकार शेतकऱ्यांच्या खिशाला थेट हातभार लावत असल्याचे यातून दिसून येते. दुष्काळाचा फटका केवळ शेतकऱ्यालाच नाही, तर ग्रामीण कुटुंबालाही बसतो. हे लक्षात घेऊन सरकारने विद्यार्थ्यांनाही दिलासा दिला आहे. दुष्काळग्रस्त भागातील शाळा आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्कात माफी देण्यात येणार आहे. रोजगार हमी योजनेच्या नियमांमध्ये शिथिलता आणून अधिकाधिक कामे सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे शेतीची कामे ठप्प झालेल्या ग्रामीण भागातील मजुरांना हक्काचा रोजगार मिळणार आहे.

पाणीटंचाईचा सामना करण्यासाठी सरकारने सूक्ष्म नियोजन केले आहे. आवश्यक त्या ठिकाणी पिण्याच्या पाण्याचे टँकर सुरू करण्यात येणार आहेत. शेतकरी आणि शेतमजुरांना अन्नधान्य पुरवण्याबरोबरच जनावरांसाठी चारा छावण्या आणि चाऱ्याची व्यवस्था करण्यात येणार आहे. पिण्याचे पाणी तसेच जनावरांच्या पाण्याची उपलब्धता यासाठी यापूर्वीच्या आदेशानुसार सुरू असलेले नियोजन कायम ठेवण्यात येणार असून जलसंधारणाची कामे मोठ्या प्रमाणावर हाती घेण्यात येणार आहेत. पुढील काळात पाणीटंचाई भासू नये, यासाठी आतापासूनच उपाययोजना केल्या जात आहेत. पंचनाम्याबाबतही सरकारने पारदर्शक आणि गतिमान व्यवस्था उभी केली आहे. दुष्काळामुळे झालेल्या पिकांच्या नुकसानीची प्रत्यक्ष पाहणी करून ५ ऑक्टोबरपासून पंचनाम्यांना सुरुवात होणार आहे.

ही कार्यवाही तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत. छायाचित्रे आणि जीपीएस माहितीसह नोंद केली जाणार असल्याने मदत थेट पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहोचणार आहे. पंचनामा, जिल्हास्तरीय प्रस्ताव, शासनाची मंजुरी आणि डीबीटीद्वारे थेट खात्यात मदत, अशी पारदर्शक साखळी राबविली जाणार आहे.विरोधक केवळ टीका करण्यात व्यस्त असताना फडणवीस सरकार प्रत्यक्ष कृतीतून शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहिले आहे. पिकांचे नुकसान, पिण्याचे पाणी, जनावरांचा चारा आणि रोजगार या चारही आघाड्यांवर एकाचवेळी उपाययोजना करणारे हे सरकार शेतकरी हिताचे खरे रक्षक असल्याचे सिद्ध झाले आहे. रब्बी हंगामासाठीही नियोजन सुरू करण्यात आले असून शेतकऱ्याला पुन्हा उभारी देण्याचा निर्धार सरकारने व्यक्त केला आहे.

## रायगडात बाप्पाला भावपूर्ण निरोप!

### १६६ सार्वजनिक गणपतींचे विसर्जन

**अलिबाग : प्रतिनिधी**

आपल्या लाडक्या गणरायाची १२ दिवस सेवा करून शुक्रवारी पुढल्या वर्षी लवकर येण्याचे निमंत्रण देत भावपूर्ण निरोप देण्यात आला. रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यक्षेत्रात कोणताही अनुचित प्रकार न घडता १६६ सार्वजनिक व २८ हजार ३७८ घरगुती गणपतींचे विसर्जन करण्यात आले. १२ दिवस सुरू असलेल्या चैतन्य सोहळ्याची उत्साहात सांगता झाली. जिल्ह्यात सर्वत्र दुपारपासूनच गणेश विसर्जनाला सुरुवात झाली. ढोल-ताशे, भव्य मिरवणुका, सर्वत्र गुलालाची उधळण करत वाजतगाजत जयजयकार करत पुढल्या वर्षी लवकर येण्याचे निमंत्रण देत भक्तिमय वातावरणात भक्तांनी आपल्या लाडक्या बाप्पाला निरोप दिला.



जिल्ह्यात अलिबाग, सासवणे, मांडवा, सारळ, काशिद, श्रीवर्धन, उरण, मुरूड आदी ठिकाणी समुद्रात गणरायांचे विसर्जन करण्यात आले. ज्या ठिकाणी समुद्र नाही तेथे तलाव, नद्या, खाड्यांमध्ये गणेशमूर्ती विसर्जित करण्यात आल्या. सार्वजनिक गणपतींच्या विसर्जन मिरवणुकांना सायंकाळी ५ वाजता प्रारंभ झाला. नाशिक बाजा, ढोल-ताशा या पारंपरिक वाद्यांबरोबरच बॅन्जो, ऑर्केस्ट्रा आणि डीजेच्या तालावर अबालवृद्ध बेधुंद होऊन नाचत होते. सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांच्या मिरवणुकीतील झांजपथक सर्वांचेच आकर्षण ठरले.

## रायगडच्या पाणी प्रश्नावर मंत्रालयात मंगळवारी बैठक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्ह्यातील वाढती पिण्याच्या पाण्याची मागणी, संभाव्य पाणीटंचाई तसेच उपलब्ध जलस्रोतांचे एकात्मिक नियोजन करण्यासाठी स्वतंत्र 'रायगड स्टेम अथॉरिटी' स्थापन करण्याबाबत आमदार प्रशांत ठाकूर यांनी केलेल्या मागणीनुसार राज्याचे जलसंपदा (विदर्भ, तापी व कोकण खोरे विकास महामंडळ), आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली आहे. ही बैठक मंगळवार दि. २९ सप्टेंबर रोजी दुपारी ३.१५ वाजता मंत्रालय, मुंबई येथील दालन क्रमांक ६०५ (विस्तार), सहावा मजला, विस्तार इमारत येथे होणार आहे.

बैठकीस आमदार प्रशांत ठाकूर यांच्यासह पाणीपुरवठा व जलसंपदा तसेच संबंधित विविध विभागांचे अधिकारी उपस्थित राहणार आहेत. बैठकीत रायगड जिल्ह्यातील वाढती पिण्याच्या पाण्याची गरज, संभाव्य पाणीटंचाई, उपलब्ध जलस्रोतांचे एकात्मिक नियोजन तसेच स्वतंत्र 'रायगड स्टेम अथॉरिटी' स्थापन करण्यासंदर्भातील बाबींवर चर्चा करण्यात येणार आहे.

## गव्हाण विद्यालयात कर्मवीर जयंती सोहळा उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांची १३९वी जयंती तसेच विविध क्षेत्रांत उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांच्या पारितोषिक वितरण सोहळ्याचे आयोजन श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेज, गव्हाण-कोपर येथे शनिवारी (दि. २६) उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आले होते.

रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या सोहळ्यास प्रमुख अतिथी म्हणून न्हावा-शेवा पोलीस ठाण्याचे एसीपी तथा ट्रिपल महाराष्ट्र केसरी विजय चौधरी उपस्थित होते. तसेच कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठाचे कुलगुरू ज्ञानदेव म्हस्के, कामगार नेते व रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य महेंद्रशेठ घरत, जनरल बॉडी सदस्य जे. एम. म्हात्रे, कॉलेज कमिटीचे चेअरमन व जनरल बॉडी सदस्य वाय. टी. देशमुख, स्कूल कमिटीचे चेअरमन अरुणशेठ भगत



### 'रयत'मुळेच मोठा झालो -लोकनेते रामशेठ ठाकूर

*अध्यक्षीय मनोगतात माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या विचारांची प्रेरणा घेऊन आपण घडल्याचे सांगितले. मी रयत शिक्षण संस्थेत शिकलो. या संस्थेमुळेच माझ्या जीवनाला दिशा मिळाली. त्यामुळे या संस्थेप्रति कृतज्ञ राहणे माझे कर्तव्य आहे, असे भावोद्गार त्यांनी व्यक्त केले. गव्हाण विद्यालयाच्या विकासासाठी यापुढेही आवश्यक ते सहकार्य करण्याची ग्वाही त्यांनी यावेळी दिली.*

### *गुणवंत विद्यार्थ्यांचा पारितोषिकांनी गौरव*

यांच्यासह स्कूल कमिटी सदस्य अनंताशेठ ठाकूर, विश्वनाथ कोळी, विजयशेठ घरत, ॲड. राहुल घरत, वसंतशेठ पाटील, रत्नप्रभा घरत, जयवंत देशमुख, अनिल देशमुख, रघुनाथ देशमुख, भार्गवशेठ ठाकूर, किशोर पाटील, भाऊ भोईर, ॲड. योगिता भगत, सुहास भगत, अंकुश पाटील, उत्तम कोळी, सायली वडवलकर, सी. एल. ठाकूर, अंकुश ठाकूर, डी. के. ठाकूर, जयश्री घरत तसेच गव्हाण पंचक्रोशीतील आजी-माजी सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, सामाजिक कार्यकर्ते, माजी विद्यार्थी, पालक व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. **(पान २ वर..)**

## निवडक

### ज्येष्ठ, महिलांसाठी १ ऑक्टोबरपासून एनसीएमसी कार्ड अनिवार्य

**मुंबई :** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या विविध सवलतींचा लाभ घेणाऱ्या अमृत ज्येष्ठ नागरिक, ज्येष्ठ नागरिक व महिला प्रवाशांसाठी १ ऑक्टोबरपासून एनसीएमसी कार्ड अनिवार्य करण्यात येणार आहे. सवलत तिकीट देताना एनसीएमसीचा वापर करण्याचा निर्णय महामंडळाने घेतला आहे. त्यासाठी राज्यभरातील एसटी आगार व बसस्थानकांवर प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

### गडचिरोलीला पावसाचा तडाखा; नागरिकांचे सुरक्षितस्थळी स्थलांतर

**गडचिरोली :** जिल्ह्याच्या दक्षिण भागात दोन दिवस मुसळधार पाऊस पडल्याने जनजीवन विस्कळीत झाले आहे. भामरागडात पुराचे पाणी शिरल्याने भामरागडसह अन्य ठिकाणच्या ५२५ नागरिकांना सुरक्षितस्थळी हलविण्यात आले. अनेक मार्गांवरील वाहतूक ठप्प झाली असून ६३ गावांचा संपर्क तुटला आहे. प्रशासन परिस्थितीवर लक्ष ठेवून आहे.


## चिरनेर जंगल सत्याग्रहातील हुतात्म्यांना मानवंदना



**उरण : रामप्रहर वृत्त**

स्वातंत्र्य संग्रामातील सुवर्ण पान म्हणून ओळखल्या जाणाऱ्या चिरनेर जंगल सत्याग्रहाचा ९६वा हुतात्मा स्मृतिदिन शुक्रवारी मोठ्या उत्साहात साजरा झाला. यावेळी हुतात्म्यांना २१ बंदुकीच्या फैरी झाडून शासकीय इतमामात मानवंदना देण्यात आली. चिरनेर येथील हुतात्मा स्मारकासमोर रायगडचे पालकमंत्री भरत गोगावले यांच्या अध्यक्षतेखाली व आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, जिल्हा परिषद अध्यक्ष मंगेश वाकडीकर यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

इंग्रज राजसत्तेविरुद्ध २५ सप्टेंबर १९३० रोजी चिरनेर येथील अक्कादेवीच्या रानमाळावर चिरनेर पंचक्रोशीतील जनतेने जंगल सत्याग्रह केला होता. या स्वातंत्र्य समरात आठ सत्याग्रहींना हौतात्म्य प्राप्त झाले होते, तर अनेक सत्याग्रहींना अटक झाली होती. या सत्याग्रहात चिरनेर गावातील धाकू गवत्या फोफेरकर व नाग्या महादू कातकरी, आलू बेमट्या म्हात्रे (दिघोडे), परशुराम रामा पाटील (पाणदिवे), रामा बामा कोळी (मोठी जुई), हसुराम बुधाजी घरत (खोपटा), रघुनाथ मोरेश्वर न्हावी (कोप्रोली), आनंदा माया पाटील (धाकटी जुई) या आठ सत्याग्रहींनी स्वातंत्र्यासाठी बलिदान दिले. **(पान २ वर..)**




## पनवेलमध्ये 'बाप्पा मोरया' सजावट स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पक्ष, पनवेल यांच्या वतीने माजी सभागृहनेते तथा नगरसेवक परेश ठाकूर यांच्या संकल्पनेतून गणेशोत्सवाच्या काळात पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यासाठी 'बाप्पा मोरया' घरगुती पर्यावरणपूरक गणपती सजावट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. उत्सवाचा आनंद साजरा करताना पर्यावरणाचे भान जपावे आणि नागरिकांच्या कलागुणांना व्यासपीठ मिळावे, हा या स्पर्धेमागील प्रमुख उद्देश होता.

पनवेल शहरातील प्रभाग क्रमांक १४, १८, १९ आणि २० मधील रहिवाशांसाठी आयोजित करण्यात आलेल्या स्पर्धेला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. ५५हून अधिक स्पर्धकांनी सहभाग नोंदवत आपल्या घरातील गणरायाची आकर्षक, कल्पक आणि पर्यावरणपूरक सजावट साकारली. गणपती सजावटीसाठी थर्माकोलच्या वस्तूंच्या वापरास सक्त मनाई करण्यात आली होती. त्याऐवजी नैसर्गिक व पर्यावरणपूरक साहित्याचा वापर करण्याचे आवाहन करण्यात आले होते. स्पर्धकांनी या आवाहनाला सकारात्मक प्रतिसाद देत विविध संकल्पना, कल्पकता आणि सामाजिक संदेश यांचा सुंदर मिलाफ साधत सजावटी साकारल्या.

त्यामुळे पर्यावरणपूरक गणेशोत्सवाचा संदेश घराघरांत पोहोचण्यास मदत झाली. या स्पर्धेत सहभागी झालेल्या सर्व स्पर्धकांची भाजप शहर अध्यक्ष तथा नगरसेवक सुमित झुंझारराव, जिल्हा उपाध्यक्ष मयुरेश नेतकर, **(पान २ वर..)**

## बोरघाटात टेम्पो-कंटेनरची धडक; दोघांचा मृत्यू

**खोपोली : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे एक्स्प्रेस वेवर बोरघाटात शनिवारी (दि. २६) दुपारी एका आयशर टेम्पोने समोरील आयशर टेम्पोला व कंटेनरला पाठीमागून जोरदार धडक दिल्याने तीन वाहनांचा भीषण अपघात झाला. या अपघातात दोघांचा जागीच मृत्यू झाला असून एक जण गंभीर जखमी झाला आहे.

मुंबई-पुणे एक्स्प्रेस वेवरून पुण्याहून आयशर टेम्पो क्रमांक केए ५२ बी ५०८९ हा चालक संदीप कोळी (३५) टेम्पोत फेव्हिकॉलसदृश माल घेऊन कोल्हापूरहून मुंबईकडे जात असताना बोरघाटात ढेकू गावच्या हद्दीत आला होता. तीव्र उतारावर टेम्पोवरील नियंत्रण सुटल्याने त्याने समोरील आयशर टेम्पोला पाठीमागून धडक दिली.

# आंतरराष्ट्रीय पर्यटकांचा गणेश विसर्जन सोहळ्यामध्ये उत्साहाने सहभाग -मुख्यमंत्री

## परदेशी पर्यटकांनी अनुभवली महाराष्ट्राच्या संस्कृतीची जादू

**मुंबई : प्रतिनिधी**

आंतरराष्ट्रीय पर्यटकांनी मोठ्या प्रमाणात उत्साहाने गणेश विसर्जन सोहळ्यामध्ये सहभाग घेतला. त्यांच्यामध्ये एक वेगळाच उत्साह पहायला मिळाला असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अनंत चतुर्दशीनिमित्त मुंबईतील गिरगाव चौपाटीवर आयोजित गणेश विसर्जनाच्या सोहळ्याच्या वेळी सांगितले.



बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्या सहाय्याने महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन विभागासाठी दरवर्षीप्रमाणे उभारलेल्या विशेष दालनात भेट दिल्यानंतर ते बोलत होते. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पर्यटन विभागाने केलेल्या आयोजनाचे कौतुक केले.

गणेश विसर्जन सोहळ्यास कौशल्य,रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा, बृहन्मुंबईच्या महापौर रितू तावडे, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या आयुक्त अश्विनी भिडे, पर्यटन संचालनालयाचे संचालक विकास पानसरे यांच्यासह परदेशी पर्यटक उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, "गणेशोत्सव हा महाराष्ट्राचा राज्यउत्सव आहे. महाराष्ट्र पर्यटन विभागाने या उत्सवाला आंतरराष्ट्रीय स्वरुप दिले. आंतरराष्ट्रीय पर्यटकांनी मोठ्या प्रमाणात उत्साहाने गणेश विसर्जन सोहळ्यामध्ये सहभाग घेतला. त्यांच्यामध्ये एक वेगळाच उत्साह पहायला मिळाला. विशेषतः येथील वातावरण व नियोजन पाहून आंतरराष्ट्रीय पर्यटक भारावून गेले. हजारो संख्येने लोक एकत्रित आल्यानंतर शिस्तबद्ध पद्धतीने पार पडलेला गणेश विसर्जन सोहळा अनुभवणे या पर्यटकांसाठी आनंदाचा क्षण होता."

गणेश विसर्जनाचा हा भव्य सोहळा 'याचि देही याचि डोळा पाहण्यासाठी' आंतरराष्ट्रीय पर्यटकांनी उपस्थिती दर्शविली होती. तसेच थायलंड येथून हा विसर्जन सोहळा अनुभवण्यास आलेले पर्यटक आरतीमध्ये तल्लीन झाले. जगभरातील २३ देशांमधील आंतरराष्ट्रीय पर्यटक व पाहुण्यांनी सदर सोहळ्यामध्ये मोठ्या उत्साहात सहभाग घेतला. या सोहळ्यानिमित्त आलेल्या या पर्यटकांना गणपती मिरवणुकीच्या भव्यतेचे दर्शन घडले. त्याचबरोबर त्यांना गणरायाची श्रद्धेने पूजा करणे, आरतीत सहभागी होणे आणि 'गणपती बाप्पा मोरया'च्या जयघोषात सामील होण्याची संधी मिळाली. पारंपरिक महाराष्ट्रीयन वेशभूषेत सज्ज होऊन, ढोल-ताशांच्या गजरात आणि भक्तिमय वातावरणात हे पर्यटक महाराष्ट्राच्या सांस्कृतिक श्रीमंतीमध्ये रमून गेले.

या उत्सवाचे साक्षीदार ठरलेले इटली येथी परदेशी पर्यटक श्री. मार्को यांनी आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले, "हा सोहळा मी पहिल्यांदाच अनुभवत आहे. हा उत्सव म्हणजे श्रद्धा, एकता आणि आनंदाचा संगम आहे. प्रत्येक वर्षी मोठ्या संख्येनी परदेशी पर्यटकांनी गणेश विसर्जन सोहळ्यामध्ये सहभागी होण्याचे मी आवाहन करतो. लाखो लोक एकाच स्वरात 'गणपती बाप्पा मोरया'चा जयघोष करताना पाहून डोळ्यात आनंदाश्रू तरळले. भारतात येऊन हा अनुभव घेणे म्हणजे माझ्यासाठी स्वप्नवत आहे." अनेक परदेशी पर्यटकांनी गणरायाच्या मनमोहक मूर्तीसोबत छायाचित्रे काढली आणि या अविस्मरणीय क्षणांना आपल्या कॅमेऱ्यामध्ये कैद केले.

पर्यटन मंत्री शंभूराज देसाई म्हणाले की,गणेशोत्सव हा महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वारशाचा अविभाज्य भाग आहे. परदेशी पर्यटकांना या उत्सवात सहभागी करून घेणे, हा आपल्या परंपरांचा जागतिक पातळीवर प्रसार करण्याचा एक सशक्त प्रयत्न आहे. यामुळे महाराष्ट्राच्या पर्यटनाला नवी उभारी मिळेल आणि आपल्या सांस्कृतिक वैभवाची ख्याती जगभरात पोहोचेल.

# अनंत चतुर्दशी दिनी ८५७३ गणेशमूर्तींना भावपूर्ण निरोप

**नवी मुंबई : बातमीदार**

महानगरपालिकेने सर्व १८९ विसर्जनस्थळी केलेल्या सुयोग्य व्यवस्थेमध्ये अनंतचतुर्दशीदिनी मोठ्या प्रमाणात होणारा श्रीगणेशमूर्ती विसर्जन सोहळा सुव्यवस्थित रितीने संपन्न झाला. नवी मुंबईतील २२ व १४ गावांतील ११ नैसर्गिक विसर्जन स्थळे आणि १५६ कृत्रिम विसर्जनस्थळे अशा एकूण १८९ विसर्जन स्थळांवर यावर्षीच्या गणेशोत्सवाच्या सांगता दिवशी ८ हजार १२५ घरगुती व ४४८ सार्वजनिक अशाप्रकारे एकूण ८ हजार ५७३ श्रीगणेशमूर्तींचे "गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या" अशा गजरात भावपूर्ण विसर्जन करण्यात आले. शाडू मातीच्या १४२० श्रीमूर्तींचे पर्यावरणपूरक दृष्टीकोन जपत भावपूर्ण विसर्जन करण्यात आले.महापौर सुजाता पाटील यांनी वाशी येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे बनविण्यात आलेल्या उंच व्यासपीठावरून विसर्जनस्थळाकडे प्रस्थान करणा-या श्रीगणेशमूर्तींवर पुष्पवृष्टी करीत श्रीगणेशाला भावपूर्ण निरोप दिला तसेच श्रीगणेशभक्तांचे स्वागत केले.



नमुंमपा क्षेत्रातील सर्वच विभागांत नागरिक मोठ्या उत्साहाने या विसर्जन सोहळ्यात सहभाग झाले होते. पहाटे ५.३० पर्यंत चाललेल्या या विसर्जन सोहळ्यासाठी महानगरपालिकेची यंत्रणा अथक कार्यरत होती. सर्वच विसर्जन स्थळांवर चोख व्यवस्था ठेवण्यात आली होती.

**विभाग निहाय आकडेवारी**

बेलापूर - ५ नैसर्गिक व २१ कृत्रिम विसर्जन स्थळांवर १२५७ घरगुती व ४३ सार्वजनिक मंडळांच्या श्रीगणेशमूर्तींचे विसर्जन

नेरुळ -२ नैसर्गिक व २४ कृत्रिम विसर्जन स्थळांवर ९८१ घरगुती व ३८ सार्वजनिक मंडळांच्या श्रीगणेशमूर्तींचे विसर्जन

वाशी -२ नैसर्गिक व १६ कृत्रिम विसर्जन स्थळांवर ९५८ घरगुती व १०५ सार्वजनिक मंडळांच्या श्रीगणेशमूर्तींचे विसर्जन

तुर्भे -३ नैसर्गिक व २१ कृत्रिम विसर्जन स्थळांवर ३९९ घरगुती तसेच ७२ सार्वजनिक मंडळांच्या श्रीगणेशमूर्तींचे विसर्जन

कोपरखैरणे- २ नैसर्गिक व १६ कृत्रिम विसर्जन स्थळांवर ११२८ घरगुती व १११ सार्वजनिक श्रीगणेशमूर्तींचे विसर्जन

घणसोली - ४ नैसर्गिक व १५ कृत्रिम विसर्जन स्थळांवर २०८१ घरगुती व ३३ सार्वजनिक मंडळांच्या श्रीगणेशमूर्तींचे विसर्जन.

# कोकिलाबेन धीरुभाई अंबानी हॉस्पिटलने पाच वर्षांच्या बालकाला दिले कॅन्सरमुक्त जीवन

**नवी मुंबई : बातमीदार**

कोकिलाबेन धीरुभाई अंबानी हॉस्पिटल, नवी मुंबईमध्ये उपचार घेतल्यानंतर, रांची येथील एका ५ वर्षांच्या मुलाला आता पूर्णपणे कॅन्सरमुक्त घोषित करण्यात आले आहे. ल्युकेमिया पुन्हा परतल्यामुळे या बालकाला पॅलिएटिव्ह केअरवर ठेवण्यात आले होते. कन्सलटंट हेमॅटो-ऑन्कोलॉजिस्ट डॉ. कुणाल गोयल यांच्या नेतृत्वाखाली, या मुलाचा कॅन्सर नियंत्रणात आणण्यासाठी टार्गेटेड इम्युनोथेरपी आणि हॅप्लोआयडेंटिकल (हाफ-मॅच) बोन मॅरो ट्रान्सप्लांट एकत्रित करून एक विशेष उपचार पद्धती तयार करण्यात आली होती.



या मुलामध्ये वयाच्या पाचव्या वर्षी पहिल्यांदा या आजाराचे निदान झाले होते, जेव्हा त्याच्या पालकांना त्याच्या पायांवर निळे डाग पडलेले आणि मानेला सूज आलेली दिसली. रक्त तपासणी केल्यानंतर त्याला 'फिलाडेल्फिया क्रोमोसोम-पॉझिटिव्ह बी-सेल अक्युट लिम्फोब्लास्टिक ल्युकेमिया' असल्याचे समोर आले. हा ब्लड कॅन्सरचा एक अत्यंत गंभीर आणि धोकादायक प्रकार आहे, ज्यामध्ये 'IKZF१ म्युटेशन' आणि 'मोनोसोमी ७' हे दोन आनुवंशिक बदल आढळतात. या दोन्ही बदलांमुळे रुग्ण बरा होण्याची शक्यता खूप कमी असते.

मुलाच्या पालकांनी आपल्या मुलाला कोकिलाबेन धीरुभाई अंबानी हॉस्पिटल, नवी मुंबई येथील हेमॅटो-ऑन्कोलॉजिस्ट, बीएमटी (बोन मॅरो ट्रान्सप्लांट) आणि सेल्युलर थेरपीज तज्ज्ञ डॉ. कुणाल गोयल यांच्याकडे आणले. डॉ. गोयल यांच्या देखरेखीखाली, त्याला एक विशेष टार्गेटेड इम्युनोथेरपी देण्यात आली. या उपचारामुळे कॅन्सरची पातळी घटून जवळपास नाहीशी झाली. यानंतर हे मूल हॅप्लोआयडेंटिकल बोन मॅरो ट्रान्सप्लांटसाठी पूर्णपणे तयार झाले, ज्यामध्ये कुटुंबातीलच एका सदस्याच्या अर्ध्या मॅच होणाऱ्या बोन मॅरोचा वापर करण्यात आला.

# सांगुर्ली जिल्हा परिषद शाळेची यशोगाथा राष्ट्रीय संकेतस्थळावर

**पनवेल : वार्ताहर**

शालेय नेतृत्व विकास कार्यक्रमांतर्गत पनवेल तालुक्यातील रायगड जिल्हा परिषदेच्या सांगुर्ली शाळेची यशोगाथा राष्ट्रीय स्तरावरील संकेतस्थळावर प्रकाशित झाली आहे. महाराष्ट्र शासनाच्या राज्यस्तरीय आदर्श शिक्षिका पुरस्काराच्या मानकरी आणि शाळेच्या मुख्याध्यापिका मानसी मिलिंद भोसले यांनी लिहिलेल्या या यशोगाथेत ग्रामीण भागातील शाळेचा शैक्षणिक परिवर्तनाचा प्रेरणादायी प्रवास उलगडण्यात आला आहे.




शालेय नेतृत्व विकास कार्यक्रमांतर्गत सन २०२५-२६ मध्ये 'सामग्री व मजकूर निर्मिती' या उपक्रमाद्वारे महाराष्ट्रातील निवडक १०० शाळांच्या प्रेरणादायी यशोगाथांची निवड करण्यात आली. शालेय शिक्षण अधिकाऱ्यांच्या माध्यमातून संकलित करण्यात आलेल्या या यशोगाथा राष्ट्रीय शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था आणि राष्ट्रीय शालेय नेतृत्व केंद्र, नवी दिल्ली यांच्या राष्ट्रीय संकेतस्थळावर प्रकाशित करण्यात आल्या आहेत.

या उपक्रमामध्ये पनवेल तालुक्यातील सांगुर्ली जिल्हा परिषद शाळेच्या यशोगाथेलाही स्थान मिळाले आहे. 'हुशार व प्रतिभावान विद्यार्थ्यांना विशेष शिक्षण देणाऱ्या शाळेची यशोगाथा' या शीर्षकाखाली ही यशोगाथा प्रकाशित करण्यात आली आहे.

या यशोगाथेत शाळेचा विकास व परिवर्तन, आदर्श शाळा निर्मिती, नाविन्यपूर्ण शैक्षणिक उपक्रम, विद्यार्थ्यांच्या प्रवेशात झालेली वाढ, पालकांचा सहभाग, स्थानिक समुदायाचा सहभाग तसेच विद्यार्थ्यांना इंग्रजी माध्यमातून शैक्षणिक संधी उपलब्ध करून देण्यासाठी करण्यात आलेल्या प्रयत्नांवर विशेष प्रकाश टाकण्यात आला आहे.

ग्रामीण भागातील शाळेच्या शैक्षणिक वाटचालीची तसेच विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीसाठी करण्यात येणाऱ्या प्रयत्नांची राष्ट्रीय स्तरावर दखल घेतली जाणे ही रायगड जिल्ह्यासह सांगुर्ली शाळेसाठी अभिमानाची बाब आहे. शालेय नेतृत्व, नाविन्यपूर्ण उपक्रम आणि सामूहिक प्रयत्नांच्या माध्यमातून ग्रामीण भागातील शाळेतही सकारात्मक शैक्षणिक परिवर्तन घडवून आणता येते, याचे सांगुर्ली शाळा प्रेरणादायी उदाहरण ठरली आहे.

पान १ वरुन

## गव्हाण विद्यालयात कर्मवीर जयंती सोहळा उत्साहात

कार्यक्रमाच्या प्रारंभी कर्मवीर भाऊराव पाटील व ज. आ. भगत यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करण्यात आले. त्यानंतर विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या मंत्रमुग्ध करणाऱ्या कर्मवीर स्तवन व स्वागतगीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. विद्यालयाच्या प्राचार्या ज्योत्स्ना ठाकूर यांनी वार्षिक अहवालाचे वाचन करताना विद्यालयाने गतवर्षभरात संपादन केलेल्या शैक्षणिक, क्रीडा व विविध स्पर्धांमधील उल्लेखनीय यशाचा आढावा घेतला. विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धा परीक्षा, शिष्यवृत्ती परीक्षा व क्रीडा क्षेत्रात मिळवलेल्या यशाची माहिती देतानाच विद्यालयाच्या आगामी विकास आराखड्याची माहिती त्यांनी उपस्थितांसमोर मांडली. शाळेच्या विकासासाठी योगदान देणाऱ्या सर्व दानशूर व्यक्तींचे त्यांनी यावेळी आभार मानले.

यानंतर इयत्ता दहावी-बारावीच्या प्रत्येक वर्गातून प्रथम व द्वितीय क्रमांक मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांसह विविध स्पर्धा, शिष्यवृत्ती परीक्षा, स्पर्धा परीक्षा व क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते रोख पारितोषिके देऊन गौरव करण्यात आला. माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, वसंतशेठ पाटील व अरुणशेठ भगत यांनी ठेवलेल्या कायम ठेव रकमेतून मिळणाऱ्या व्याजातून तसेच यावर्षी महेंद्रशेठ घरत यांनी दिलेल्या ५० हजार रुपयांच्या योगदानातून विद्यार्थ्यांना एकूण एक लाख ३२ हजार ८७५ रुपये रकमेची पारितोषिके वितरित करण्यात आली.

विद्यालयाच्या विकासात माजी विद्यार्थ्यांनीही आपले योगदान देत सामाजिक बांधिलकी जपली. माजी विद्यार्थी ॲड. राहुल घरत यांनी सुमारे ७ लाख ७५ हजार रुपये खर्चून विद्यालयासाठी सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची सुविधा उपलब्ध करून दिली. संजय नाना पाटील यांनी स्पर्धा परीक्षेत यशस्वी होणाऱ्या विद्यार्थ्यांना पारितोषिके देण्यासाठी अडीच लाख रुपये कायम ठेव म्हणून दिले. वैभव घरत यांनी ५० हजार रुपये किमतीचा वॉटर कूलर विद्यालयाला भेट दिला. या तिन्ही माजी विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी विद्यालयातील गुणवंत शिक्षक म्हणून रवींद्र भोईर, सुरेश पारखे, गणेश भोईर व प्रतिज्ञा घरत यांचाही विशेष सत्कार करण्यात आला. विद्यार्थी मनोगतात स्मित कुंदन मोगल याने केलेल्या प्रभावी भाषणाने उपस्थितांची मने जिंकली. त्याच्या वक्तृत्वाचे मान्यवरांनी भरभरून कौतुक केले. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी एसीपी विजय चौधरी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना क्रीडा क्षेत्रात प्रामाणिकपणे मेहनत घेऊन नाव कमवावे, खेळाडूवृत्ती जोपासावी आणि आई-वडिलांचे मार्गदर्शन स्वीकारावे, असे आवाहन केले. विद्यार्थ्यांच्या विविध क्षेत्रांतील कामगिरीचे त्यांनी कौतुक केले. वाय. टी. देशमुख व महेंद्रशेठ घरत यांनी आपल्या मनोगतात विद्यालयाच्या प्रगतीचे कौतुक करून विद्यार्थ्यांनी कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या स्वावलंबी शिक्षणाच्या विचारांची प्रेरणा घेऊन शैक्षणिक प्रगती साधावी, असे आवाहन केले. कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठाचे कुलगुरू ज्ञानदेव म्हस्के यांनी प्रमुख वक्ते म्हणून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांचा मानसिक, बौद्धिक आणि सर्वंकष विकास साधण्यासाठी शिक्षणाबरोबरच विविध अनुभव, वाचन, संस्कार आणि सकारात्मक विचारांची आवश्यकता असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाच्या शेवटी स्कूल कमिटीचे चेअरमन अरुणशेठ भगत यांनी उपस्थित सर्व मान्यवर, पालक, माजी विद्यार्थी, शिक्षक व विद्यार्थ्यांचे आभार मानले. मुख्याध्यापक विलासराव लेंभे, पर्यवेक्षिका शशिकला पाटील, रवींद्र भोईर, देवेंद्र म्हात्रे आणि सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी यांनी या कार्याच्या यशस्वी आयोजनासाठी मेहनत घेतली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हर्षला पाटील आणि दर्शना माळी यांनी केले. संपदा म्हात्रे यांच्या वंदे मातरम गीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

## चिरनेर जंगल सत्याग्रहातील हुतात्म्यांना मानवंदना

त्यांच्या हौतात्म्याला मानवंदना देण्यासाठी दरवर्षी २५ सप्टेंबर रोजी चिरनेर येथील हुतात्मा स्मारकासमोर चिरनेर पंचक्रोशीतील जनता एकवटते. त्यानुसार जंगल सत्याग्रहाच्या पवित्र स्मृतिदिनानिमित्त दुपारी १२ वाजता हुतात्म्यांना अभिवादन करण्यात आले.

यावेळी पोलीस यंत्रणेकडून बंदुकीच्या २१ फैरी झाडून हुतात्म्यांना शासकीय सलामी देण्यात आली. यावेळी चिमुकल्या विद्यार्थ्यांनी चिरनेर जंगल सत्याग्रहाची प्रभावी नाटिका सादर करून स्वातंत्र्यलढ्यातील या ऐतिहासिक आंदोलनाची आठवण जागवली. संवाद, अभिनय आणि प्रसंगांच्या माध्यमातून त्यांनी स्वातंत्र्यसैनिकांच्या त्याग व संघर्षाची गाथा उपस्थितांसमोर उभी केली. त्यांच्या दमदार सादरीकरणाला उपस्थितांकडून उत्स्फूर्त दाद मिळाली. यावेळी पालकमंत्री भरत गोगावले यांनी आपल्या भाषणात चिरनेरच्या या स्वातंत्र्यलढ्यात आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्या हुतात्म्यांच्या शौर्याला आणि त्यागाला अभिवादन केले. त्यांच्या बलिदानाची प्रेरणा पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचवणे आणि त्यांच्या स्मृती जपणे ही आपली सामूहिक जबाबदारी असल्याचे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाला कॅबिनेट मंत्री तथा रायगडचे पालकमंत्री भरत गोगावले, भाजप प्रदेश चिटणीस आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, रायगड जिल्हा परिषद अध्यक्ष मंगेश वाकडीकर, ज्येष्ठ नेते जे. एम. म्हात्रे, पनवेल महापालिकेचे महापौर नितीन पाटील, उद्योगपती पी. पी. खारपाटील, भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, मुख्य कार्यकारी अधिकारी स्नेहा भोसले, उरणचे तहसीलदार उद्धव कदम, गटविकास अधिकारी सर्जेराव पाटील, आदिवासी विभाग अधिकारी तेजस्विनी गलांडे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक जगदीश शेलकर यांच्यासह सर्वपक्षीय नेते उपस्थित होते. या कार्यक्रमाचे औचित्य साधून हुतात्मे व सत्याग्रहींच्या वारसांचा यथोचित सन्मान करण्यात आला.

## पनवेलमध्ये 'बाप्पा मोरया' सजावट स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद

प्रभाग १४ अध्यक्ष गणेश म्हात्रे, युवा मोर्चा जिल्हा माजी उपाध्यक्ष चिन्मय समेळ आणि पदाधिकाऱ्यांनी वैयक्तिकरीत्या भेट घेऊन त्यांना सहभाग चषक व प्रमाणपत्र देऊन गौरविले.

स्पर्धेतील अंतिम निकाल पुढील काही दिवसांत जाहीर करण्यात येणार आहेत. विजेत्यांना एकूण २५ हजार रुपयांपर्यंतची आकर्षक पारितोषिके देण्यात येणार आहेत. गणेशोत्सव हा केवळ धार्मिक उत्सव न राहता सामाजिक व पर्यावरणीय जाणिवा निर्माण करणारा उत्सव ठरावा, या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या उपक्रमातून नागरिकांनीही पर्यावरण संवर्धनाचा संदेश कृतीतून अधोरेखित केला.

# सीकेटी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चांगू काना ठाकूर आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेजच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०२६-२७ अंतर्गत 'राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिन' व 'नूतन स्वयंसेवक उद्बोधन कार्यक्रम' गुरुवार, दि. २४ सप्टेंबर रोजी कॉमर्स रिसोर्स सेंटर येथे उत्साहात संपन्न झाला.

कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते सरस्वती माता, संस्थेचे प्रेरणास्थान कै. जनार्दन भगत साहेब, कै. चांगू काना ठाकूर साहेब व कै. श्रीमती भागूबाई चांगू ठाकूर यांच्या प्रतिमांचे पूजन व पुष्पहार अर्पण करून झाली. त्यानंतर राष्ट्रीय सेवा योजनेचे अधिकृत गीत सादर करण्यात आले. महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. (डॉ.) एस. के. पाटील यांनी कार्यक्रमाचे मुख्य अतिथी प्रा. तुळशीदास कोमल (माजी रायगड जिल्हा समन्वयक, राष्ट्रीय सेवा योजना, मुंबई) तथा डॉ. दत्ता हिंगमिरे (रायगड झोन-१ क्षेत्र समन्वयक) यांचे स्वागत आणि सत्कार करत महाविद्यालयाच्या कीर्तीचा मागोवा घेत महाविद्यालयीन आयुष्यात राष्ट्रीय सेवा योजनेचा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासात असणाऱ्या भूमिकेबाबत भाष्य केले.

मुंबई विद्यापीठ रा.से.यो.चे रायगड (झोन-१) क्षेत्र समन्वयक डॉ. दत्ता हिंगमिरे यांनी विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक भान आणि नैतिक मूल्यांची रुजवणूक करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजना हे एक प्रभावी माध्यम असल्याचे स्पष्ट केले.प्रा. टी. पी. मोकल यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, "२४ सप्टेंबर १९६९ रोजी भारत सरकारने समाजसेवेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासासाठी राष्ट्रीय सेवा योजनेची स्थापना केली.

स्वयंसेवकांनी केवळ पदवीपुरते मर्यादित न राहता सामाजिक बांधिलकी जपत राष्ट्र उभारणीत सक्रिय योगदान दिले पाहिजे". यासोबतच राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना विविध शिबिरे, युथ/कल्चरल एक्सचेंज, आर.डी. परेड कॅम्प, नेतृत्व विकास शिबीर, राष्ट्रीय साहसी शिबीर, राष्ट्रीय एकात्मता शिबीर यांसारख्या संधीबाबत माहिती दिली.

महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो.डॉ.एस.के.पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय सेवा योजनेचे मुख्य कार्यक्रम अधिकारी प्रा. ए. व्ही. पाटील, कार्यक्रम अधिकारी प्रा. ए.एस. भानुशाली, डॉ. एल. क्यू. रेहमान, महिला कार्यक्रम अधिकारी डॉ. बी.एम.भोईर, एन.एस.एस. अभ्यासक्रम समन्वयक प्रा.आर. बी. माने, व रा.से.यो. स्वयंसेवकांनी विशेष परिश्रम घेतले.

# पनवेल महानगरपालिका क्षेत्रात १० दिवसाच्या गणपतींना भावपूर्ण वातावरणात निरोप

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महापालिका क्षेत्रातील कळंबोली, कामोठे, पनवेल, खारघर या चारही प्रभागात व नावडे उपविभागात दहा दिवसांचे ६ हजार ९७३ घरगुती व सार्वजनिक गणपतींचे भाक्तिमय वातावरणात नियोजनबध्दरित्या शांततेत विसर्जन करण्यात आले.

माझी वसुंधरा ७.० अंतर्गत स्वच्छ, सुंदर आणि प्रदूषणमुक्त पनवेलसाठी पनवेल महानगरपालिका विविध उपक्रम राबवित आहे. या अंतर्गतच सणांचं पावित्र्य आणि पर्यावरणाचे भान राखले जावे यासाठी महापौर नितीन पाटील, आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्यासाठी 'उत्सव गणरायाचा जागर पर्यावरणाचा' ही मोहिम हाती घेतली आहे. गणेशभक्तांच्या सोयी – सुविधांसाठी पालिकेच्या बांधकाम विभाग, आरोग्य विभाग, विद्युत विभाग, परवाना विभाग, भांडार विभाग, वाहन विभाग व वैद्यकीय विभाग,पर्यावरण विभागांच्या माध्यमातून समन्वय साधून विसर्जन घाटांवरती संपूर्ण तयारी करण्यात आली होती. याकामी विविध एनजीओ, सामाजिक संघटना, पोलीस प्रशासन यांचे देखील महापालिकेस सहकार्य लाभले.





यावर्षी महापालिकेच्या बांधकाम विभागाच्या वतीने एकुण १०६ ठिकाणी विसर्जनाची सोय करण्यात आली आहे. यामध्ये ७७ ठिकाणी नैसर्गिक विर्सजन ठिकाणे असून २९ ठिकाणी कृत्रिम तलावांची विसर्जनासाठी सोय करण्यात आली आहे. या सर्व विसर्जनाच्या ठिकाणी सुरक्षा रक्षक, विद्युत व्यवस्था, सीसीटिव्ही स्टेज, टॉवरची सोय, टेबल खुर्च्या, लाऊड स्पीकर,निर्माल्य कलश, लाईव्ह जॅकेटची सोय करण्यात आली होती.

याबरोबरच विसर्जन कार्यक्रम सुरळित पार पडावा यासाठी महापौर नितीन पाटील, उपमहापौर प्रमिला पाटील, सभागृह नेते प्रकाश बिनेदार, माजी सभागृह नेते परेश ठाकूर,स्थायी समिती सभापती बबन मुकादम , विरोधी पक्षनेते अरविंद म्हात्रे यांनी सर्व विसर्जन स्थळांना भेटी देऊन कामकाजाची माहिती घेतली व मार्गदर्शन केले. तसेच सर्व प्रभाग सभापती, सर्व महापालिका सदस्य यांनी आपआपल्या प्रभागामधील विसर्जन स्थळांना भेटी देऊन विसर्जन सुरळीत व्हावे यासाठी सहकार्य केले. तसेच आयुक्त मंगेश चितळे यांनीही विविध विसर्जन स्थळांना भेटी देऊन पाहाणी केली. तसेच त्यांच्या सूचनेनूसार अतिरीक्त आयुक्त गणेश शेटे, अतिरीक्त आयुक्त महेशकुमार मेघमाळे, परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे, उपायुक्त वैभव विधाते, उपायुक्त स्वरूप खारगे, उपायुक्त रविकिरण घोडके, उपायुक्त नानासाहेब कामठे, उपायुक्त अभिषेक पराडकर, शहर अभियंता राजेश कर्डिले, सहाय्यक आयुक्त डॉ. रूपाली माने , सहाय्यक आयुक्त सुबोध ठाणेकर, सहायक आयुक्त बाळाराम रातांबे,चारही प्रभाग अधिकारी, महापालिका अधिकारी, कर्मचारी , आरोग्य कर्मचारी, यांनी पालिकेच्या सर्व विसर्जन स्थळांवर उपस्थित राहून पुर्णवेळ व्यवस्थापन केले.

विसर्जन घाटांवर गणपतींचे सुरळीत विसर्जन व्हावे यासाठी महापालिकेच्या वतीने अग्निशमन दल, वाहतूक विभाग, विद्युत विभाग, बांधकाम विभाग, घनकचरा व आरोग्य विभागातील स्वच्छता निरीक्षक, पर्यावरण विभाग, आरोग्य निरीक्षक, सफाई कर्मचारी, मुख्यालय कर्मचारी तसेच पोलिस विभागाच्या वतीने चोख बंदोबस्त करण्यात आला. तसेच वैद्यकिय आरोग्य विभागाच्या वतीने प्रत्येक विसर्जन स्थळांवरती सेवा देण्यात आली.





पनवेलः महानगर पालिकेचे नगरसेवक राजू सोनी यांचा वाढदिवस शुक्रवारी उत्साहात साजरा झाला. वाढदिवसानिमित्त राजू सोनी यांनी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची त्यांच्या निवासस्थानी भेट घेत आशीर्वाद घेतले. यावेळी लोकनेते रामशेठ ठाकूर व माजी सभागृह नेते नगरसेवक परेश ठाकूर यांनी पुष्पगुच्छ देऊन राजू सोनी यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा शुभेच्छा दिल्या. यावेळी भाजप नेते संजय भगत, पवन सोनी, चिन्मय समेळ, अशोक आंबेकर, संजय जाधव आदी मान्यवर उपस्थित होते.



पनवेल : भारतीय जनता पार्टीचे युवा कार्यकर्ता कृपेश कांडपिळे यांचा वाढदिवस शुक्रवारी उत्साहात साजरा झाला. वाढदिवसानिमित्त कृपेश कांडपिळे यांनी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची त्यांच्या निवासस्थानी भेट घेत आशीर्वाद घेतले. यावेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी पुष्पगुच्छ देऊन कृपेश कांडपिळे यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा शुभेच्छा दिल्या. यावेळी सौ. शकुंतला ठाकूर, भाजप नेते संजय भगत, स्वरा कांडपिळे आदी उपस्थित होते.

## नगरसेविका परेशा पटेल यांच्या मागणीला यश

### डास प्रतिबंधासाठी फॉगिंग व केमिकल स्प्रे

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महानगरपालिका प्रभाग क्रमांक ४ मधील सेक्टर १९, २०, २१, १३ व १४ परिसरात पावसाळ्यात डासांचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात वाढल्याने नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला होता. डासांमुळे होणाऱ्या आजारांचा धोका लक्षात घेऊन प्रभाग क्रमांक ४ च्या नगरसेविका परेशा ब्रिजेश पटेल यांनी पनवेल महानगरपालिका प्रशासनाकडे पत्राद्वारे तातडीने फॉगिंग व डास प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याची मागणी केली होती.

या मागणीची दखल घेत पनवेल महानगरपालिकेच्या वतीने प्रभाग क्रमांक ४ मधील विविध परिसरात फॉगिंग तसेच केमिकल स्प्रेची फवारणी करण्यात आली. पावसाळ्याच्या काळात डासांचा वाढता प्रादुर्भाव आणि त्यातून होणाऱ्या आजारांना आळा घालण्यासाठी नियमित अंतराने फॉगिंग व आवश्यक प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात याव्यात, अशी मागणी नगरसेविका परेशा ब्रिजेश पटेल यांनी केली आहे.

नागरिकांचे आरोग्य आणि परिसराची स्वच्छता याला माझे सर्वोच्च प्राधान्य आहे. डासांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना सातत्याने करण्यात याव्यात, यासाठी प्रशासनाकडे पाठपुरावा सुरू राहील असे नगरसेविका परेशा पटेल यांनी सांगितले.

## मांडवी एक्सप्रेस मधून एक लाख रुपयांचा मदय साठा जप्त

**नवीन पनवेल :** एक लाख छत्तीस हजार रुपये किमतीचा परराज्यातील विदेशी मद्य राज्य उत्पादन शुल्क पनवेल शहर यांनी जप्त केले. या प्रकरणी २३ सप्टेंबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.

२३ सप्टेंबर रोजी परराज्यातील गोवा राज्यात निर्मित मद्याची वाहतूक होणार असल्याची माहिती उत्पादन शुल्क विभागाला मिळाली. त्यानुसार रात्री साडेसातच्या सुमारास मांडवी एक्सप्रेसच्या कोच डब्याची झडती घेतली असता कोचच्या पाठीमागच्या टॉयलेटमध्ये चार सॅक बॅग मिळून आल्या. या बॅगमध्ये विविध ब्रँडच्या गोवा राज्य निर्मित आणि फक्त गोवा राज्य विक्रीसाठी असलेल्या विदेशी मद्याने भरलेल्या प्लास्टिक आणि काचेच्या सीलबंद बाटल्या मिळून आल्या.

यावेळी या बॅगबाबत चौकशी आणि मालकीबाबत विचारणा केली असता कोणीही मालकीबाबत समोर आले नाही. उत्पादन शुल्क विभागाने एक लाख छत्तीस हजार रुपये किमतीचा मदय साठा जप्त करून गुन्हा दाखल केला. ही कारवाई बीडी फणसेकर निरीक्षक, यो. लोळे, कृ. देवरे, वाय व्ही पाडळे, एस मोरे, एस पवार, एस बुधावले, हर्षदा घरत यांनी केली.





पनवेल : नेवाळी गावातील जय हनुमान मंदिराच्या जीर्णोद्धारासाठी तसेच नूतन मंदिराच्या बांधकामासाठी आयोजित भूमिपूजन सोहळा उत्साहात संपन्न झाला. या कामाचे भूमिपूजन भाजपचे प्रदेश चिटणीस आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी श्री हनुमंताच्या चरणी नतमस्तक होत मंदिराच्या नूतन वास्तूचे बांधकाम निर्विघ्नपणे पूर्ण व्हावे, तसेच या माध्यमातून परिसरातील धार्मिक व सांस्कृतिक परंपरेला अधिक बळ मिळावे, अशी मनोभावे प्रार्थना केली. यावेळी पनवेल पंचायत समितीचे उपसभापती भूपेंद्र पाटील, नगरसेविका प्रतिभा भोईर, सरपंच राजेश काथारा यांच्यासह ग्रामस्थ व अन्य मान्यवर उपस्थित होते.



पनवेल : वाजे येथील गुणवंत खेळाडू गौरव सुभाष तांबे याची नॅशनल लेव्हल सायकल चॅम्पियनशीप स्पर्धेत निवड झाली आहे. या राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेतील सहभागासाठी आणि पुढील प्रवासासाठी आमदार प्रशांत ठाकूर यांच्या माध्यमातून त्याला १५ हजार रुपयांची आर्थिक मदत देण्यात आली आहे. या मदतीचा धनादेश भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुनशेठ भगत यांच्या हस्ते त्याला सुपूर्द करण्यात आला. या धनादेश वाटप प्रसंगी शाम भालेकर, अंकुश पाटील, राजेंद्र भालेकर, गणेश पाटील यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.

## 'सेवा संकल्प अभियान' अंतर्गत पनवेल महानगरपालिके तर्फे आयोजित 'एक पेड माँ के नाम' वृक्षारोपण मोहीम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेच्या वतीने १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर २०२६ या एक महिन्याच्या कालावधीत 'सेवा संकल्प अभियान' महापौर नितीन पाटील व आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येत आहे.

या अंतर्गत दिनांक २६ सप्टेंबर रोजी पर्यावरण संवर्धन आणि स्वच्छतेची बांधीलकी जपत, केंद्र सरकारच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार देशभरात सुरू असलेल्या 'स्वच्छता ही सेवा' या उपक्रमांतर्गत महानगरपालिकेच्या वतीने आज प्रभाग क्रमांक २० मधील तक्का गाढी नदी परीसरात सकाळी 'एक



पेड माँ के नाम' या विशेष वृक्षारोपण मोहिमेचे आयोजन करण्यात आले. यावेळी पनवेल महानगरपालिका प्रभाग समिती "ड" चे सभापती अजय बहिरा ,नगरसेविका श्वेता बहिरा ,नगरसेविका प्रियांका कांडपिळे यांनी आपल्या आईच्या नावाने एक रोप लावून त्यांच्या प्रती आदर व कृतज्ञता व्यक्त केली.

उपायुक्त डॉ वैभव विधाते यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम घेण्यात आला.यावेळी तक्का ग्रामस्थ , उद्यान पर्यवेक्षक सिद्धार्थ कांबळे,स्वच्छता निरीक्षक अभिजीत भवर, सुपरवायझर गौतम जाधव,नितीन ठाकूर,स्वच्छता दुत आणि उद्यान विभागाचे कर्मचारी उपस्थित होते.

### स्वच्छता ही सेवा २०२६ अंतर्गत विशेष स्वच्छता मोहीम

"स्वच्छता ही सेवा २०२६" या अभियानांतर्गत पनवेल महानगरपालिकेचे स्वच्छता कर्मचारी व छत्रपती शिवाजी महाराज विद्यापीठाच्या एनएसएस कॉर्डिनेटर जयश्री सक्सेना,संदीप गायकवाड तसेच एनएसएसच्या विद्यार्थ्यांच्या सहभागातून विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.

या मोहिमेदरम्यान बल्लाळेश्वर विसर्जन घाट,वडाळे तलाव जॉगिंग ट्रॅक परिसराची स्वच्छता करण्यात आली. यावेळी या परिसरातील प्लास्टिक बाटल्या, प्लास्टिक कचरा, पालापाचोळा, निर्माल्य व इतर घनकचरा गोळा करून एकत्रित करण्यात आला. एनएसएसच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत परिसराची स्वच्छता केली तसेच स्वच्छता, पर्यावरण संवर्धन आणि सार्वजनिक ठिकाणे स्वच्छ ठेवण्याचा संदेश दिला.



## पंडित दीनदयाळ उपाध्याय जयंती निमित्त अभिवादन

**पनवेल :** भारतीय जनता पक्षाचे सहसंस्थापक आणि प्रखर राष्ट्रचिंतक पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या जयंतीनिमित्त पनवेल तालुका व शहर भाजपच्या मध्यवर्ती कार्यालयात त्यांच्या पवित्र स्मृतीस विनम्र अभिवादन करण्यात आले. यावेळी पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या जीवनकार्याचे स्मरण करण्यात आले. 'साधी राहणी आणि उच्च विचारसरणी' हा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा स्थायीभाव होता. भारतीय संस्कृती, समाजव्यवस्था आणि राष्ट्रजीवनाचा सखोल अभ्यास करताना त्यांनी शास्त्रे, धर्मग्रंथ तसेच विविध तात्त्विक ग्रंथांचे चिंतन व मनन केले. त्यातून त्यांनी 'एकात्म मानववाद' हा विचार मांडला. समाजातील शेवटच्या घटकापर्यंत विकासाची फळे पोहोचली पाहिजेत, तसेच राष्ट्रजीवनात भारतीय मूल्यांना महत्त्वाचे स्थान मिळाले पाहिजे, या विचारांना त्यांनी आपल्या कार्यातून अधोरेखित केले.

राष्ट्रसेवा, सामाजिक बांधिलकी आणि भारतीय विचारपरंपरेप्रती त्यांची निष्ठा त्यांच्या कार्यातून सातत्याने दिसून आली. पंडित दीनदयाळ उपाध्याय यांचे विचार आणि राष्ट्रसेवेची प्रेरणा आजही कार्यकर्त्यांसाठी मार्गदर्शक ठरत असून, जयंतीनिमित्त उपस्थितांनी त्यांच्या स्मृतींना विनम्र अभिवादन केले.

## फार्मासिस्ट दिन २०२६ निमित्त राष्ट्रीय स्तरावरील ई-पोस्टर सादरीकरण स्पर्धेचे आयोजन

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

श्री डी. डी. विसपुते कॉलेज ऑफ फार्मसी अँड रिसर्च सेंटर, नवीन पनवेल यांच्या वतीने इंडियन फार्मास्युटिकल असोसिएशन (भारतीय औषधनिर्माण संघटना), रायगड शाखेच्या सहकार्याने जागतिक फार्मासिस्ट दिन २०२६ निमित्त राष्ट्रीय स्तरावरील ई–पोस्टर सादरीकरण स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेची संकल्पना "निरोगी भविष्यासाठी फार्मासिस्टचे सक्षमीकरण"अशी होती.


या स्पर्धेला देशभरातील विविध शैक्षणिक संस्थांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. एकूण १०५ संघ आणि सुमारे २५० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. विद्यार्थ्यांनी ई–पोस्टरच्या माध्यमातून वैज्ञानिक ज्ञान, सर्जनशीलता, नाविन्यपूर्ण कल्पना, संशोधनवृत्ती आणि सादरीकरण कौशल्य प्रभावीपणे प्रदर्शित केले.

स्पर्धेत एनएमआयएमएस, हैदराबाद; ओरिएंटल कॉलेज ऑफ फार्मसी, सानपाडा; संदीप इन्स्टिट्यूट ऑफ फार्मास्युटिकल सायन्सेस, नाशिक; तसेच डॉ. भानुबेन नानावटी कॉलेज ऑफ फार्मसी, विलेपार्ले या संस्थांमधील विद्यार्थ्यांनी सहभाग घेत उल्लेखनीय कामगिरी करत विविध पारितोषिके मिळवली.



# बॉबी @५३ वर्षे; आजही तारुण्यात असलेला प्रेमपट










झूम प्रहर

दिलीप ठाकूर
चित्रपट समीक्षक

चित्रपट रसिकांच्या पिढ्या ओलांडल्या, बदलल्या. चित्रपट पाहण्याच्या पध्दतीत बदल होत गेले, रेडिओ ते यू ट्यूब असा माध्यमांनी प्रवास केला, वृत्तपत्रातील शुक्रवारची चित्रपट समिक्षा ते सोशल मीडियात काही सेकंदाच्या रिलमध्ये बरेच काही, आगाऊ तिकीट विक्रीसाठी लांबलचक रांगेत उभे रहाणे ते ऑनलाईन तिकीट, सकाळी घरी येत असलेल्या वृत्तपत्रांच्या माध्यमातून बातमी समजणे ते डिजिटल चॅनेलवरील काही घडतेय बिघडतेय तोच बातमी असा बराच प्रवास सुरू असला, काळ पुढे सरकत असला तरी काही चित्रपट कायमच तारुण्यात राहतात. त्या चित्रपटाच्या प्रिंटवर चरे पडत नाहीत अथवा त्या चित्रपटाची पोस्टर्स फाटली जात नाहीत.

राज कपूर निर्मित आणि दिग्दर्शित 'बॉबी' हा चित्रपट असाच आहे, आजही हा चित्रपट लोकप्रिय आहे. पुन्हा पुन्हा पहावासा वाटतो. हम तुम एक कमरे मे बंद हो और चाबी खो जाए...आजच्या मोकळ्या ढाकळ्या सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक वातावरणात याचं कदाचित फार काही गैर वाटणार नाही (तसे ते गैरच. पण युवक युवतीमधील मैत्री, प्रेम यांचं प्रमाण पूर्वीच्या तुलनेत फारच मोकळं ढाकळ, बिनधास्त आणि बेधडक दिसतेच आहे. त्यातून काही समस्या निर्माण होत आहेत. नातेसंबंध महत्वाचा की फायदा तोटा असा प्रश्न निर्माण झाला आहे.) त्रेपन्न वर्षांपूर्वी मात्र 'और चाबी खो जाए' हे फारच धाडस होते. मग ते पिक्चरमधलं का ना असे? तोपर्यंत कृष्ण धवल अर्थात ब्लँक अ‍ॅण्ड व्हाईट चित्रपट मागे पडत होता आणि त्यासह चित्रपटातीलही बुजरेपणा, प्रतिकात्मक प्रेम या गोष्टीही मागे पडत होत्या. चित्रपट संस्कृतीतील हीदेखील एक वैशिष्ट्यपूर्ण गोष्ट.

राज कपूर निर्मित, दिग्दर्शित व संकलीत 'बॉबी' (रिलीज २८ सप्टेंबर १९७३. चक्क त्रेपन्न वर्ष पूर्ण झाली हो. कधी झाली हो इतकी वर्षे पूर्ण ? आज जगण्याला वेग आला आहे याचा हा परिणाम आहे का ?) पडद्यावर आला तेव्हापासून आजही गाजतोय. जुन्या काळातील असे अनेक चित्रपट आजही गाजताहेत. मेहबूब खान दिग्दर्शित मदर इंडिया, के. असिफ दिग्दर्शित मुघल ए आझम, राज कपूर दिग्दर्शित बरसात, गुरुदत्त दिग्दर्शित प्यासा, विजय आनंद दिग्दर्शित गाईड, बी. आर. चोप्रा दिग्दर्शित नया दौर असे बरेच चित्रपट सांगता येतील. हिंदी चित्रपटसृष्टीच्या चौफेर वाटचालीत पहिला धाडसी प्रेमपट ही 'बॉबी'ची सर्वकालीन ओळख. पिक्चर आणि प्रेम यांचं नातं ( साटेलोटे म्हटलं तरी चालेल) पडद्यावरच्या दृश्य माध्यमाच्या अगदी सुरुवातीच्या काळापासून. उत्कट प्रेम, बुजरे प्रेम, एकतर्फी प्रेम, असोशी, जिव्हाळा, प्रतिकात्मक दृश्य, विरह, दुःख, कोणी 'देवदास' बनणे, कधी 'मुगल ए आझम'चा ऐतिहासिक फंडा, कधी 'चोरी चोरी' प्रेम तर कधी 'दिल एक मंदिर'ची भावना तर कधी 'दिल भी तेरा हम भी तेरे'ची कबूली. कधी 'दिलने फिर याद किया'ची भावना.

हिंदी चित्रपटाच्या पडद्यावर 'प्रेमरस ' वाहतच होता, आजही वाहतोय, पुढेही वाहिल. हिंदी चित्रपटाची सर्वात मोठी खासियत म्हणजे प्रेमाच्या गोष्टी. पडद्यावरच्या आणि पडद्यामागच्याही. 'बॉबी'ने त्यात चक्क 'क्रांती ' केली. इतिहास घडवला. क्रेझ निर्माण केली. बॉबी नावाने अनेक सौंदर्य प्रसाधने विक्रीला आली आणि त्यांचा विक्रमी खप वाढला. मुझे कुछ कहना है मुझे भी कुछ कहना है...प्रियकरला प्रेयसीचा तेवढाच तत्पर जबाब. हे सगळेच नवीन होते हो तेव्हा आणि एव्हाना सत्तरचे दशक सुरु होऊन रसिकांचीही नवीन पिढी आली होती. गवताची काडी चावून चावून प्रेम संवाद बोलणारे प्रेमिक पुरे झाले आता प्रेमाची कृती हवी होती.

'मेरा नाम जोकर' (१९७०) फ्लॉप झाल्यावर राज कपूर कर्जबाजारी झाला, आर. के. स्टुडिओ गहाण ठेवला अशा अनेक कथा/दंतकथा/गोष्टी/स्टोरीज कायमच सांगितल्या जातात. तरी पुढच्याच वर्षी याच आर. के. फिल्म बॅनरचा रणधीर कपूर दिग्दर्शित 'कल आज और कल' (१९७१) आलाय, त्याचा विसर का पडावा? आपल्याला 'जोकर'चे अपयश विसरायचयं आणि प्रेक्षकांनाही त्याची आठवण करुन द्यायची नाही असं काही करुया असे राज कपूरने लेखक के. ए. अब्बास आणि पटकथा लेखक वसंत साठे यांना सांगितले आणि नवीन पर्व सुरु झाले. मी मीडियात आल्यावर बॉम्बे पब्लिसिटी सर्विसमुळे माझे वसंत साठे यांच्याशी चांगले संबंध निर्माण झाले आणि गप्पांच्या ओघात त्यांच्याकडून 'बॉबी'बद्दल काही गोष्टी जाणून घेता आल्या. 'बॉबी' चित्रपट काढण्यास राज कपूर यांना प्रवृत होण्यास एक कॉमिक जबाबदार आहे. राजकपूर नेहमी आर्ची कॉमिक्स वाचत असे, एक दिवस कॉमिक वाचत असताना त्यांतील एक संवाद त्याच्या वाचण्यात आला, तो होता 'यू आर टू यंग टू फॉल इन लव'– ये उम्र नहीं है प्यार की. हा संवाद वाचून त्याच्या डोक्यात वीज चमकल्यासारखे झाले व 'बॉबी' चित्रपटाची कल्पना रुजत गेली. त्या वेळच्या युवकांची जीवनशैली, मानसिकता, प्रेमातील धिटाई याचे 'रुपेरी पडद्यावरील रुपड' म्हणजे 'बॉबी' ठरला. पूर्ण नाव बॉबी जॅक ब्रेगेन्झा.

ते राजेश खन्नाच्या क्रेझचे दिवस होते. तो सांगेल ती 'प्राईज' द्यायला निर्माते द्यायला तयार होते. राज कपूरला राजेश खन्नाची 'किंमत' देणे शक्य नव्हतेच. शशी कपूरने त्याला सुचवले, कोवळ्या वयातील ( टीनेजर) प्रेमकथेसाठी आपला चिंटू (अर्थात ऋषी कपूर) परफेक्ट. पण त्याला वजन कमी करावे लागले. आता 'बॉबी' कोण? राज कपूर 'नायिकांच्या निवडीबद्दल ' विशेष ख्यातनाम. नायिकेचे सौंदर्य आणि व्यक्तिरेखेचे वैशिष्ट्य यांचा योग्य मेळ घालण्यात त्याच्यातील दिग्दर्शक नेहमीच ओळखला गेला. चिंटू एकोणीस वर्षाचा म्हणजे 'बॉबी' सोळा वर्षांची हवी. राज कपूरचा 'बॉबी गर्ल 'साठीचा शोध सुरु झाला. 'दो कलिया','दस लाख', 'वारीस' इत्यादी चित्रपटांतील बालकलाकार बेबी सोनिया आता मोठी झाली होती आणि आता ती नीतू सिंग होती. राज कपूरला फ्रेश चेहरा हवा होता. थीम आणि रसिकांना कनेक्ट होईल असा. ख्रिश्चन युवतीची व्यक्तिरेखा होती. नफिसा अलीच्याही नावाचा विचार झाला. डिंपल कापडियाच्या रुपाने 'बॉबी' मिळाली. बातमी झाली आणि गाजलीही. 'बॉबी' म्हटलं की डिंपल कापडिया हे कायमस्वरुपी हिट समीकरण. तिनेही बॉबीचं दिसणं, असणं, हसणं, पाहणं असं काही साकारल, राज कपूरच्या दिग्दर्शनातील काही सर्वोत्तम परफॉर्मन्समध्ये 'बॉबी डिंपल 'चे स्थान बरेच वरचे. पहिल्याच चित्रपटात भारी अभिनय. त्यात सौंदर्य, फॅशन, नृत्य आणि आवश्यक तेथे बोल्ड लूक या सगळ्याची मस्त केमिस्ट्री. डिंपल कपाडिया पहिल्या शोपासूनच स्टार झाली. तिचा चाहतावर्ग निर्माण झाला. तिच्या पोस्ट कार्ड साईज फोटोना मागणी आली. १९७३ च्या अनेक मराठी दिवाळी अंकाच्या मुखपृष्ठावर डिंपल कपाडियाला स्थान मिळाले.

चिंटू हा कपूर असल्याने आणि 'मेरा नाम जोकर 'मध्ये लहानपणीचा राज कपूर साकारल्याने त्याला 'कॅमेरा' म्हणजे काय, दिग्दर्शक म्हणजे काय याची साधारण कल्पना होतीच. कपूर म्हणजे चित्रपट हे नाते तसे घट्ट पण डिंपलला सगळचं नवीन. आपले पिता चुन्नीलाल कापडिया यांच्या जुहू चौपाटीवरील प्रशस्त बंगल्यात ती लहानाची मोठी झाल्याने तिच्या वागण्यात सहजता होती. राज कपूरचा पिक्चर म्हणजे गीत, संगीत व नृत्य यांची झक्कास जमलेली केमिस्ट्री. त्याच्या चित्रपटाच्या पटकथेतच गाण्याची जागा असे. आणि आपल्या चित्रपटाचा मुहूर्त गाण्याच्या रेकॉर्डिंगने करण्याची त्याची पध्दत. 'बॉबी'चीही दोन गाणी रेकॉर्ड करीत मुहूर्त झाला. आनंद बक्षी, विठ्ठलभाई पटेल आणि इंद्रजितसिंग तुलसी यांच्या गीतांना लक्ष्मीकांत प्यारेलाल यांचे संगीत. लता मंगेशकर यांचे डिंपलला पार्श्वगायन (अभिनेत्रींच्या प्रत्येक नवीन पिढीसाठी लता मंगेशकर गात राहिल्या) पण चिंटू कपूरसाठी नवीन आवाज हवा. वसंत साठेसाहेबांनी शैलेन्द्र सिंगचे नाव सुचवले. लक्ष्मीकांत प्यारेलाल यांनी त्याच्या 'आवाजाची परीक्षा' घेऊनच मग त्याला संधी दिली. शैलेन्द्र सिंग पुण्यातील एफटीआयमधून अभिनयाचे प्रशिक्षण घेतले होते. संधी पार्श्वगायक म्हणून मिळाली. ( 'दो जासूस'पासून हीरोही झाला.) संगीतकार लक्ष्मीकांत यांनी 'बॉबी'ची एक आठवण मला सांगितली होती, मुकेशजींनी मला व प्यारेभाईंना सांगितले, राज कपूर तुमच्याकडून 'बॉबी'चे संगीत करुन घेण्यास इच्छुक आहे. आम्ही म्हटले, त्यांच्या चित्रपटांना शंकर जयकिशन यांचे संगीत असते आणि आम्ही त्यांचे चाहते आहोत. मुकेश म्हणाले, राज कपूरने शंकर जयकिशन यांना त्याची कल्पना दिली आहे. आम्ही राज कपूरची भेट घेतली तेव्हा ते 'बॉबी'च्या संगीताबद्दल अतिशय फोकस्ड होते. मेहबूब स्टुडिओतील रेकॉर्डिंग स्टुडिओत 'मै शायर तो नही'च्या रेकॉर्डिंगने 'बॉबी'चा मुहूर्त करायचे ठरले. आवाजाची टेस्ट घेऊन शैलेन्द्रसिंगचे नाव निश्चित केले होते. गंमत म्हणजे, 'बॉबी' हे नायकाचे नाव असावे असे आम्ही समजत होतो. ते नायिकेचे नाव आहे असे समजताच आम्ही गाण्यांचा टोन बदलला. राज कपूरचे समाधान होईल असे संगीत आम्ही दिले. पुढचा इतिहास सर्वांनाच माहित आहे, लक्ष्मीकांत म्हणाले.

आर. के. स्टुडिओत राजा (चिंटू कपूर) याच्या प्रशस्त घराचा सेट लागला. राजा आपल्या वाढदिवसानिमित्त मै शायर तो नहीं गाणे गातो याचे सर्वप्रथम चित्रीकरण ठरले. चिंटू कपूर तयार होऊन सेटवर आल्यावर त्याचं पहिलं लक्ष गेले ते नृत्य दिग्दर्शक कोण आहे याकडे. त्याने तसे त्याचा मित्र आणि तेव्हा राज कपूरचा सहाय्यक दिग्दर्शक असलेल्या राहुल रवैलला त्याबद्दल विचारले. राज कपूरचं म्हणणं होतं, या गाण्यात चिंटूचे नैसर्गिक हावभाव हवेत. एकादा नृत्य दिग्दर्शक निवडायचा तर तो अन्य अभिनेत्याप्रमाणे सुचवणार. तसं नको होतं. राज कपूरमधला दिग्दर्शक येथेही दिसतोय. आजही हे गाणे पाहताना चिंटू कपूरची स्वाभाविक शैली दिसते आणि ती छान वाटते.

प्राणने एकही रुपया मानधन न घेता या चित्रपटात भूमिका साकारल्याची बरीच चर्चा झाली. त्या काळात चित्रपटाची दोन रिळे झाली. कश्मीरचे आऊटडोअर्स शूटिंग पार पडले. आणखीन दोन गाण्यांचे रेकॉर्डिंग झाले. आर. के. स्टुडिओत सेट लागलाय, पाकिस्तानी गायिका रेश्मा हिच्या अखियो से....गाण्याने प्रभावित होऊन राज कपूरने लता मंगेशकर यांच्याकडून अखियो मे रहने दे अखियों की दास्ता हे गाणे रेकॉर्ड केले अशा अधूनमधून बातम्या येत. पिक्चरचे पीआरओ बनी रुबैन यात मास्टर माईंड आणि राज कपूरला चित्रपटाच्या मीडिया हाईपचे महत्व चांगलेच माहित. 'बॉबी'बद्दल निर्मितीवस्थेतच उत्सुकता वाढत वाढत गेली आणि एक दिवस फारच मोठा शॉक बसला, 'बॉबी ' गर्ल डिंपल कापडियाने सुपर स्टार राजेश खन्नाशी लग्न केले. चित्रपटसृष्टीच्या इतिहासातील हा सर्वात मोठा आश्चर्याचा धक्काच. चित्रपट रसिक डिंपलला पडद्यावर पाहण्यास प्रचंड इच्छुक असतानाच हे काय घडले? अजून 'बॉबी'चे सगळे शूटिंग पूर्णही झाले नव्हतेच. आणि आता हे नवदाम्पत्य हनिमून आणि भटकंतीत मश्गुल असल्याने 'बॉबी'साठी डिंपलच्या तारखा मिळणे अवघड झाले. यश चोप्रा दिग्दर्शित 'दाग'च्या मिनर्व्हातील प्रीमियरला हे पती पत्नी आले.

'बॉबी' पूर्ण होत आला आणि गाण्याची तबकडी (तो ग्रामोफोनचा काळ होता) मार्केटमध्ये आली तोच गाणी हिट. राज कपूरच्या चित्रपटाच्या परंपरेला धरुनच ते होते. मै शायर तो नही, मुझे कुछ कहना है, हम तुम एक कमरे मे बंद हो, घे घे सायबा प्यार मे सौदा नही, झूठ बोले कौवा कांटे ही गाणी सर्वकालीन लोकप्रिय. गाणी गायली होती लता मंगेशकर, शैलेंद्र सिंह,नरेन्द्र चंचल, व याचे गीतकार होते आनंद बक्षी, विठ्ठलभाई पटेल आणि इंद्रजितसिंग तुलसी. बिनाका गीतमाला, इराणी हॉटेलमधील जुक्स बॉक्स, लाऊडस्पीकर असं सगळीकडे 'बॉबी'चे संगीत. पिक्चरची पब्लिसिटी म्हणून बॉबीची सौंदर्य प्रसाधने, मिनी स्कर्ट, पुढे गाठ मारलेला शर्ट, रिशी कपूरने चित्रपटात वापरलेली मिनी राजदूत स्कूटर, लेदर जॅकेट, मफलर, बेल बॉटम हे मार्केटमध्ये विक्रीला आले. वातावरण एकदम बदलून गेले. 'बॉबी'ची हवा निर्माण झाली आणि मुंबईत मेन थिएटर मेट्रोत भव्य दिमाखदार प्रीमियरने चित्रपट प्रदर्शित झाला आणि पहिल्याच शोपासूनच असा काही सुपर हिट की पन्नास आठवड्यांचा मुक्काम.

पिक्चरमध्ये राजा बॉबी ब्बेगन्झाला भेटायला वस्तीत जातो तेव्हा बेल मारताच बॉबी दरवाजा उघडते तेव्हा तिच्या उजव्या हाताला चण्याचं पीठ लागलेले असते आणि त्याच हाताने ती आपली बटा ठीक करते हा प्रसंग राज कपूरने आपण नर्गिसला भेटायला तिच्या घरी गेलो त्यावरुन सुचल्याचा किस्सा खूप गाजला. हिट पिक्चर असे अनेक किस्से चर्चेत आणतो. आजच्या डिजिटल युगात जेन झी आणि जेन अल्फा पिढीलाही "बॉबी" च्या किश्याची मोहिनी घातली आहे. मुंबईनंतर टप्प्याटप्प्याने देशातील अन्य राज्यात, शहरांत यशाची कमान कायम राहिली. उत्तर भारतात तर गावात 'बॉबी' लागलेल्या थिएटरपर्यंत बस सेवा सुरु झाली. पिक्चरचं यश हे असं भिनायचं. हम तुम एक कमरे मे बंद हो या गाण्याचे काश्मीरमधील गुलमर्ग येथील टूरिस्ट हॉटेलमध्ये शूटिंग झाले ते आजही 'बॉबी' हॉटेल म्हणून ओळखले जाते. 'बॉबी'चे यशच बावन्न वर्ष टिकलय म्हटल्यावर काय हो. आणि यापुढेही ते असेच टिकणार आहे. 'बॉबी' धुवाधार गर्दीत सुरु असतानाच डिंपल संसारात रमली. आई झाली. ( 'बॉबी'नंतर बारा वर्षांनी १९८५ साली जावेद अख्तर यांची पटकथा आणि रमेश सिप्पी दिग्दर्शित 'सागर 'पासून तिने पुनरागमन केले ती स्टोरी वेगळी आणि अनेक वळणे घेत घेत चाललेली.

सागर प्रदर्शित होत असताना बॉबीचे दिवस असा प्रसार माध्यमातून फोकस टाकण्यात आला.) मला आठवतय 'बॉबी'च्या वेळेस मेट्रोत स्टॉल दोन रुपये वीस पैसे, अप्पर स्टॉल तीन रुपये तीस पैसे, बाल्कनी चार रुपये चाळीस पैसे आणि ड्रेस सर्कल पाच रुपये पन्नास पैसे असे तिकीट होते. माझे ते शालेय वय होते आणि लांबलचक रांगेत उभा राहून स्टॉलचे तिकीट मिळताच प्रचंड सुखावलो. ते दिवसच वेगळे होते. सत्तरच्या दशकातील चित्रपट रसिक हा एका वेबसिरीजचा भन्नाट विषय आहे. चित्रपटात प्रेमनाथ, प्राण, दुर्गा खोटे, अरुणा इराणी, प्रेम चोप्रा, फरीदा जलाल इत्यादींच्याही भूमिका आहेत. प्रेम नाम है मेरा... प्रेम चोप्रा हा प्रेम चोप्राचा डायलॉग असा काही सुपर हिट ठरला, कालांतराने त्या नावाचे नाटकही आले आणि प्रेम चोप्राने आपल्या आत्मचरित्राला तेच नाव दिले. हिट पिक्चर काय काय घडवतो बघा... चित्रपट फक्त आणि फक्त पडद्यावर राहत नाही, त्याचा परिणाम आणि प्रवास ही एक वेगळी गोष्ट. चित्रपट संस्कृतीतील त्याचं महत्व आहे.


'बॉबी'ला फ़िल्मफेअर पुरस्कार सर्वोतम अभिनेता, सर्वोत्कृष्ट अभिनेत्री ,सर्वश्रेष्ठ कला निर्देशन, सर्वश्रेष्ठ पार्श्व गायक म्हणून नरेन्द्र चंचल यांना बेशक मंदिर मस्जिद या गाण्यासाठी मिळाले. हिट पिक्चरची रिमेक तर बनणारच. तो दीर्घकालीन अलिखित नियम आहे आणि त्यात काहीच गैर नाही. पण ती जमली पाहिजे. सगळ्यांनाच ते जमत नाही. तेथे पाहिजे त्या फिल्मी जातीचे. गायत्री चित्र या बॅनरखाली कथा, पटकथा, संवाद व दिग्दर्शन अशा जबाबदाऱ्या दिनेश यांनी पेलल्या आणि 'प्रीत तुझी माझी' (१९७५) हा मराठी चित्रपट पडद्यावर आणला. महेश कोठारे (एव्हाना बालकलाकार म्हणून वाटचाल पूर्ण होत होती) आणि गोव्याची सुंदरी राधा बारटक्के अशा जोडीच्या या प्रेमपटाला रसिकांनी नाकारले. त्या काळात शॉर्टसमधील राधिका बारटक्के मराठी रसिकांना आवडली नाही. आज कदाचित "बॉबी"ची मराठीतील रिमेक रंगतदार ठरेल पण त्यात राज कपूर टच कुठून आणणार? राज कपूर चोवीस तास चित्रपट या कलेचा विचार करणारा फिल्मवाला होता.

१९८० साली पर्शियन भाषेत 'parvaz dar ghafas' अशी रिमेक आली. 'बॉबी'चा रंग म्हणा, सर म्हणा रिमेकला येईल कशी? 'बॉबी'चं तारुण्य आजही कायम आहे तर मग आणखीन काय हवे? आपल्या देशात पारंपरिक लोकप्रिय हिंदी चित्रपटाचाही इतिहास विशेष उल्लेखनीय आहे. आज चेंबूर परिसरात जाण्या येण्याचा योग येताना वर्षानुवर्षे वर्षांच्या सवय आणि आवडीप्रमाणे आर. के. स्टुडिओवर नजर पडते तेव्हा आर. के.चा तो हुकमी ट्रेडमार्क आणि प्रवेशद्वार दिसते, पण स्टुडिओच्या जागेवर उंचच उंच इमारती उभ्या राहिल्या आहेत असे दिसते. तेव्हा याच आर. के. फिल्मने रुपेरी पडद्यावर आणलेल्या बरसात, आवारा, श्री ४२०, संगम, मेरा नाम जोकर, बॉबी, सत्यम शिवम सुंदरम असे अनेक चित्रपट आठवतात आणि मीडियात असल्यानेच या वास्तूत अनेकदा जाण्याचे सुखद योग आले तेही आठवते.

---

# समाजसुधारक राजा राममोहन रॉय

निमित्त



राजा राममोहन रॉय हे एक भारतीय समाजसुधारक होते. त्या काळात प्रशासनासाठी वापरली जाणारी भाषा पर्शियन व अरेबिक होती. त्यामुळे या भाषा शिकण्यासाठी वडिलांनी त्यांना पाटणा येथे पाठविले. अरबी आणि फारसी भाषांबरोबरच त्यांनी इस्लाम धर्म आणि सुफी पंथ, शायर आणि शायरी यांचादेखील अभ्यास केला. हाफीज आणि सादी हे त्यांचे आवडते शायर होते. आज राजा राममोहन रॉय यांचा स्मृतीदिन आहे. त्यानिमित्त जाणून घेऊया त्यांच्याविषयी या लेखातून...

पाटण्याचे शिक्षण पूर्ण केल्यावर वयाच्या बाराव्या वर्षी जिच्या माहेरची मंडळी प्रामुख्यान पौरोहित्य करणारी होती, त्या आपल्या आईच्या आग्रहामुळे, हिंदु धर्माचे शिक्षण घेण्यासाठी म्हणून राममोहन रॉय यांना काशीला पाठवण्यात आले. तिथे त्यांनी संस्कृत भाषेबरोबरच वेद, वेदान्त, उपनिषदे अशा गोष्टींचा अभ्यास केला. सोळाव्या वर्षापर्यंत त्यांनी बनारसमधे वास्तव्य केले. त्यानंतर ते बौद्ध धर्माचा अभ्यास करण्यासाठी बनारसला व नंतर तिबेटमध्ये गेले. पर्शियन लिपीत व अरेबिक भाषेत त्यांनी 'वेदान्त' ग्रंथ नावाचे पहिले पुस्तक लिहिले. १८१५ मध्ये कलकत्ता येथे परतल्यावर त्यांनी 'वेदान्त' ग्रंथाचे बंगाली भाषेत भाषांतर केले.

घरी परतल्यावर त्यांनी तुहफतूल मुवाहीद्दीन (एकेश्वरवाद्यांना भेट) नावाचा अरबीत प्रस्तावना असणारा एक लेख फारसीमधे लिहिला. त्यामधे त्यांनी मूर्तिपूजेवर कडाडून टीका केली होती. त्यांच्या मते मूर्तिपूजा ही वेदांच्या शिकवणुकीच्या विरुद्ध होती. त्या लेखामुळे वडिलांशी त्यांचे पटेनासे झाले आणि ते घर सोडून निघून गेले.

मुगल सम्राट दुसरा अकबर याने राममोहन रॉय यांना राजा ही उपाधी बहाल केली. मुगल सम्राटचे राजदूत म्हणून ते इंग्लंडला गेले होते. भारतातून इंग्लंडला जाणारे ते पहिले भारतीय होते. राजा राममोहन रॉय यांना भारतात नवविचाराचे जनक म्हटले जाते. त्यांनी सर्वप्रथम ब्रह्मपत्रिकानावाचे वृत्तपत्र सुरू केले.

राजा राममोहन रॉय ह्यांनी मूर्तिपूजेला, देवदेवतांच्या पूजेला विरोध केला. जीवसृष्टीचा निर्माता एकच आहे व तो निर्गुण, निराकार आहे,असे ते मानत. हिंदू धर्मातील कालबाह्य झालेल्या रूढी व परंपराना त्याचा विरोध होता. भारतातील समाजाला नवी दिशा देणे ही त्यांची इच्छा होती. त्यासाठी त्यांनी १८२८ साली ब्राम्हो समाजाची स्थापना केली. ख्रिश्चन धर्माचा आभ्यास केला. जुन्या प्रथा, परंपराविरुद्ध लढा दिला. भारतातील धर्मव्यवस्था, अर्थव्यवस्था, व शिक्षणव्यवस्था यासंदर्भात लेखन करण्यास सुरुवात केली.त्यासाठी काही वृतपत्रे तसेच सुधारणा चळवळ सुरू केली. त्यांनी ४ डिसेंबर १८२१ रोजी संवाद कौमुदी हे बंगाली भाषेतील तर १२ एप्रिल १८२२ रोजी मिरातउल अखबार हे पर्शियन वृतपत्र सुरू केले. त्यांनी १८२८ साली प्रेसिडेन्सी कॉलेज सुरू केले.

राजा राममोहन रॉय यांनी लॉर्ड विलियम बेंटिक या भारताच्या गव्हर्नर जनरलच्या साहाय्याने सन १८२९मध्ये भारतातील सतीची प्रथा कायद्याने बंद करविली.

**राजा राममोहन रॉय यांचे वर्तमानपत्र व साहित्य**

तुहफत–उल–मुवहिद्दीन, वेदांत ग्रंथ (वेदांत सार), संवाद कौमुदी, मिरात उल अखबार, गौडिय व्याकरण, १८२४ साली बंगाली या भाषेत इतिहास व भूगोल इ. अनेक विषयांवर पुस्तकांचे लिखाण.

(साभार विकिपीडिया)

# पेणमध्ये बाप्पाला भक्तिमय वातावरणात निरोप

**पेण : प्रतिनिधी**

भाद्रपद शुद्ध चतुर्थीला मोठ्या भक्तिभावाने गणपती बाप्पांची प्राणप्रतिष्ठापना करून दहा दिवस बाप्पांची मनोभावे सेवा केल्यानंतर अनंत चतुर्दशीला शुक्रवारी 'गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या' असा जयघोष करत गणेशभक्तांनी आपल्या लाडक्या बाप्पाला भक्तिमय वातावरणात निरोप दिला.





यावेळी नंदीमाळ नाका येथे भारतीय जनता पार्टीतर्फे उभारण्यात आलेल्या स्वागत कक्षात माजी नगराध्यक्षा प्रितम पाटील, सभापती निळकंठ म्हात्रे, नगरसेविका जास्विन पाटील, माजी नगरसेवक अजय क्षीरसागर, भाजप महिला मोर्चा अध्यक्षा सुप्रिया चव्हाण, भाजप शहर अध्यक्ष रवींद्र म्हात्रे, नगरसेवक मितेश शहा आदी पदाधिकाऱ्यांच्या वतीने गणरायांवर पुष्पवृष्टी करण्यात आली.

पेण तालुक्यात एकूण ६ सार्वजनिक गणपतींचे आणि घरगुती गणपतींचे मोठ्या जल्लोषात वाजतगाजत सवाद्य मिरवणुकांनी उत्साहात विसर्जन करण्यात आले. शहरातील वीज कर्मचारी मंडळ गणेशोत्सव, रिक्षा चालक-मालक संघटना सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ, न्यू स्टार मित्र मंडळ तरेआळी, ईगल ग्रुप मित्र मंडळ नंदीमाळ नाका व आंबेगाव येथील गणेशोत्सव मंडळ, शेणे येथील सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ अशा ६ सार्वजनिक गणपतींचे तसेच तालुक्यातील घरगुती गणपतींचे सवाद्य मिरवणुकांनी विसर्जन करण्यात आले.

शहरातील गणपतींचे येथील भोगावती नदीच्या विसर्जन घाटावर, तर ग्रामीण भागातील गणपतींचे त्या त्या गावातील नदीपात्रात व तलावात विसर्जन करण्यात आले. विसर्जनासाठी निघालेल्या मिरवणुकांनी शहरातील रस्ते फुलून गेले होते. यावेळी छत्रपती शिवाजी महाराज चौकात शांतता समितीच्या सदस्यांकडून व पोलिस प्रशासनाकडून, तसेच नंदीमाळ नाका आणि गणेश विसर्जन घाटावर नगरपरिषदेच्या वतीने गणेशभक्तांचे स्वागत करण्यात आले. नदीपात्रात कोणीही उतरू नये तसेच सुरक्षेची काळजी घेण्याचे आवाहन नगरपरिषदेच्या वतीने करण्यात आले. कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी उपविभागीय पोलिस अधिकारी जालिंदर नालकुल यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक संदीप भोसले यांनी ठिकठिकाणी चोख पोलीस बंदोबस्त ठेवला होता.


## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की आमचे अशिलानी मौजे चिंचवली तर्फे वाजे ता. पनवेल, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेली मिळकत कायम स्वरुपी खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**-जमिनीचे वर्णन-**

**मौजे- चिंचवली तर्फे वाजे, ता. पनवेल, जि. रायगड**

| मौजे | जमिन भोगवटादाराचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार |
|---|---|---|---|---|---|
| चिंचवली तर्फे वाजे | गजानन सिताराम पाटील | ७३ | १ | ०-५८-८०<br>०-०९-२० | ७.१९ |
| | | | एकूण | ०-६८-०० | |

**वरील जमिन मिळकती पैकी गजानन सिताराम पाटील यांच्या हिश्यातील ०-५८-८० पो.ख ०-९-२० पैकी ०-२०-०० गुठे जमिन बाबत जाहीर नोटीस**

तरी वरील मिळकतीच्या बाबतीत अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, गहाण, दान, बक्षिस, साठेकरार, वचनपत्र, कुळ, वहिवाट, लिज, अन्नवस्त्र, पोटगी, इजमेंट, वारसाहक्क, हुकूमनामा वगैरे असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून २१ दिवसांच्या आत आपली लेखी हरकत प्रथमदर्शनी पुराव्यासहीत खालील सही करणार यांचेकडे रजि. पोस्टाने अथवा समक्ष दाखल करावी. वरील मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास वरील मिळकती या निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून सदरचे मिळकतीचे खरेदीचा व्यवहार पूर्ण केला जाईल व उशीरा येणा-या हरकती आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत ह्याची नोंद घ्यावी.

**ठिकाण: पनवेल**
**दिनांक: २६/०९/२०२६**

**सही/-**
**ॲड. प्रधान मधूकर पाटील**
१३५, नगरपालिका कॉम्प्लेक्स,
ता. पनवेल, जि. रायगड मोबाईल. ९३२४३७५५०२


# लोणेरेत ज्ञानेश्वर माऊलींच्या ज्ञानपरंपरेचे चिंतन

**माणगाव : प्रतिनिधी**

संत ज्ञानेश्वर माऊली यांच्या ७५० व्या जयंती वर्षानिमित्त महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालय आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'ज्ञानेश्वर माऊली विद्वत परिषद २०२६' शनिवारी उत्साहपूर्ण आणि वैचारिक वातावरणात पार पडली. सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत झालेल्या या परिषदेत संत ज्ञानेश्वरांच्या विचारविश्वाचा विविध अंगांनी वेध घेण्यात आला.




महाराष्ट्राचे सांस्कृतिक कार्य, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता मंत्री ॲड. आशिष शेलार यांच्या मार्गदर्शनाखाली या विशेष उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजनिश कामत यांच्या मार्गदर्शनाखाली कुलसचिव डॉ. सचिन पोरे यांच्या हस्ते विद्वत परिषदेचे उद्घाटन झाले.यावेळी संयुक्त संचालक डॉ. हर्षदीप जोशी, डॉ. अरविंद किवळेकर, डॉ. अमित शेष, आर्यन देसाई, प्रा. बालाजी पुलचवाड, सीमा स्वामी यांच्यासह विद्यापीठातील विविध विभागांचे प्रमुख, प्राध्यापक, अधिकारी, कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

परिषदेत संतोष वझे, ॲड. डॉ. नंदकुमार मराठे आणि डॉ. वैभव नरवडे यांनी प्रमुख व्याख्याने दिली. ज्ञानेश्वरीतील तत्त्वज्ञान, अध्यात्म, साहित्य, संस्कृती आणि समकालीन जीवनातील ज्ञानेश्वरांच्या विचारांचे महत्त्व या विविध पैलूंवर वयांनी प्रकाश टाकला. संत ज्ञानेश्वरांच्या साहित्यकृतींमधून अभिव्यक्त होणारी ज्ञान, भक्ती, समता आणि मानवतावादी विचारांची परंपरा आजच्या सामाजिक वास्तवाच्या संदर्भात समजून घेण्याचा प्रयत्न या परिषदेत करण्यात आला.ज्ञानेश्वरीतील तत्त्वज्ञान केवळ अध्यात्मापुरते मर्यादित नसून मानवी जीवन, सामाजिक समता आणि व्यापक मानवकल्याणाचा विचार त्यात सामावलेला असल्याचे विविध वयांच्या मांडणीतून अधोरेखित झाले.

विद्वान, अभ्यासक, प्राध्यापक, विद्यार्थी व साहित्यरसिकांच्या सहभागामुळे परिषदेला वैचारिक समृद्धी लाभली. संत ज्ञानेश्वर माऊलींच्या ७५० व्या जयंती वर्षानिमित्त ही परंपरा नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याचा संदेश देण्यात आला.

# पेण-कासमाळ रस्त्याच्या काँक्रिटीकरणाला सुरुवात

**पेण : प्रतिनिधी**

पेण शहरापासून अवघ्या चार किमी अंतरावर असणाऱ्या कासमाळ आणि इतर आदिवासी वाड्यांना जोडणाऱ्या पेण-कासमाळ रस्त्याचे खड्ड्यांत रूपांतर झाले होते. या रस्त्याबाबत गावकऱ्यांच्या पाठपुराव्यामुळे भाजप नेते ललित पाटील यांनी याची दखल घेतली असून अखेर पेण-कासमाळ रस्त्याच्या दुसऱ्या टप्प्याचे दत्त मंदिर ते कॅनल रोडपर्यंत काँक्रिटीकरण सुरू झाले आहे.



२०१६ साली बांधण्यात आलेल्या पेण ते धनगरमाळ रस्त्यावर जागोजागी खड्डे पडले होते. आता मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून २ किमी रस्त्यासाठी सुमारे २ कोटी ८० लाख रुपयांच्या निधीतून हे काँक्रिटीकरण होत आहे. पेण-कासमाळ हा रस्ता बांधून डांबरीकरण करून सुमारे दहा वर्षे झाली आहेत. येथे चालणाऱ्या ओव्हरलोड वाहतुकीमुळे या रस्त्याला खड्ड्यांचे ग्रहण लागले होते. स्थानिक नागरिक आणि पत्रकार यांच्या मागणीमुळे पेण ते दत्त मंदिर हा पहिला टप्पा मागील वर्षी पूर्ण झाला होता.

उर्वरित दोन टप्प्यांपैकी दत्त मंदिर ते कॅनल रोड आणि कॅनल रोड ते कासमाळ ही कामे बाकी होती. भाजप नेते ललित पाटील यांच्या प्रयत्नांतून आणि आमदार रविशेठ पाटील यांच्या आमदार निधीतून दत्त मंदिर ते कॅनल रोड या दुसऱ्या टप्प्याचे काम सुरू झाल्यामुळे बोरगाव येथील स्थानिक नागरिक आणि प्रवाशांमध्ये आनंद व्यक्त होत आहे. आता उर्वरित तिसरा टप्पा कॅनल रोड ते कासमाळ याचेही काँक्रिटीकरण लवकरात लवकर सुरू करावे, अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून होत आहे. पेण ते कासमाळ रस्त्याच्या काँक्रिटीकरणामुळे अनेक वर्षे खड्ड्यातून प्रवास करणाऱ्या आदिवासी तसेच इतर नागरिकांना दिलासा मिळणार आहे. या काँक्रिटीकरणामुळे १५ ते १६ आदिवासी वाड्या थेट पेण शहराशी जोडल्या जाणार आहेत. त्यामुळे या आदिवासी वाड्यांचा आणि तेथील परिसराचा झपाट्याने विकास होणार आहे.


## जाहीर नोटीस

सर्व तमाम लोकांस जाहीर नोटीसीने असे कळविणेत येत आहे की, मौजे - बारापाडा, ता-पनवेल, जि-रायगड, येथील खाली वर्णन केलेल्या व्यक्तीच्या मालकी हक्काची, मिळकत वा जमीन ही आमचे आशिलांनी कायमस्वरूपी विकण्याचे ठरविले आहे. तरी, सदरहू मिळकतीचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरीता प्रस्तुत जाहीर प्रसिध्द करीत आहोत. सदर मिळकतीचे वर्णन येणेप्रमाणेः

**- मिळकतीचे वर्णन -**

**मौजेः बारापाडा,तालुका-पनवेल,जिल्हा - रायगड**

| गाव | भोगवटदारांचे नाव | गटक्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर पॉ. | आकाराणी रू.पै. |
|---|---|---|---|---|
| बारापाडा | १ सविता सुभाष दिठवळ<br>२ प्रसाद वामन कोंडे देशमुख<br>३ मंगेश महादेव पाटील<br>४ मनिष महादेव पाटील<br>५ महेश महादेव पाटील<br>६ शरद लडकु पाटील<br>७ सुनिल लडकु पाटील<br>८ एकनाथ दत्तु म्हात्रे | २६/६ | २.८४.००<br>०.६२.००<br>३.४६.००<br>हे.आर.पॉ. | ४.५१ |
| | | एकुण | ३.४६.०० | |

सदरहू जागा, जमिन व मिळकतीसंबंधी अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचे गहाण, दान, बक्षीस, लिज, पोटगी, कोर्ट जप्ती, अगर अन्य कोणत्याही प्रकारचे इजमेंट, दावे, फरोक्त, वचनचिठ्ठी, खरेदीखत, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, लिज, साठेकरार, कुलमुखत्यारपत्र, करार-मदार, हक्क, हितसंबंध असलेल्या व्यक्तींना, इतर वारसांचा वा संबंधीतांना ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून २१ दिवसांच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विषद करून प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्त्यावर, समक्ष तथा रजिस्टर पोस्टाने लेखी कळवावे.

जर वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही किंवा असल्यास सदर हरकती, तक्रारी रद्दबातल आहेत किंवा त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरून आमचे आशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजीत व्यवहार पूर्ण करतील व विहीत मुदतीच्या न येणाऱ्या कोणत्याही हरकती/तक्रारी आमचे अशिलावर बंधनकारक असणार नाहीत याची संबंधीतांनी नोंद घ्यावी.

**ठिकाणः पनवेल**
**दिनांकः २६/०९/२०२६**

**सही/-**
**ॲड. सरिता महेंद्र साखरे**

पत्ता- बंन्सल असोसिएस, पहिला मजला प्लॉट नं.३०, सेक्टर १/२, रोड नं.४ नविन पनवेल, बालाजी मंदिरच्या समोर ता. पनवेल जि. रायगड. ४१०२०६.


# झाडे जगवा, झाडे वाचवाचा संदेश; पर्यावरण संवर्धनासाठी स्तुत्य उपक्रम




**मोहोपाडा : प्रतिनिधी**

'स्वच्छता ही सेवा' अभियान तसेच पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत ग्रामपंचायत वासांबे-मोहोपाडा यांच्या वतीने मोहोपाडा आळी-आंबिवली परिसरात १०० सुपारीच्या रोपांची लागवड करण्यात आली.'झाडे लावा, झाडे जगवा' या उद्देशाने तसेच सेवा संकल्प अभियानांतर्गत हा उपक्रम राबविण्यात आला.

ग्रामपंचायत वासांबे-मोहोपाडाच्या सरपंच उमा संदीप मुंढे यांच्या हस्ते सुपारीच्या रोपांची लागवड करण्यात आली. यावेळी ग्रामपंचायत सदस्य केदार भोईर यांच्यासह ग्रामपंचायतीचे कर्मचारी उपस्थित होते. लागवड करण्यात आलेल्या सर्व रोपांची नियमित देखभाल आणि संगोपन ग्रामपंचायतीचे कर्मचारी आणि सदस्य करणार आहेत.

त्यामुळे या उपक्रमातून परिसरातील हरित क्षेत्र वाढण्यास तसेच पर्यावरणाचा समतोल राखण्यास मदत होणार आहे. ग्रामपंचायतीच्या या पर्यावरणपूरक आणि सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या उपक्रमाचे नागरिकांकडून कौतुक होत आहे.

## चौलमध्ये 'ज्ञानयज्ञ'चे भव्य आयोजन

**रेवदंडा :** चौल येथील ब्राह्मण समाजाच्या वतीने सलग तीन दिवस विविध विषयांवरील व्याख्याने आणि पुस्तक प्रकाशनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. 'ज्ञानयज्ञ' या उपक्रमाचे यंदा २६ वे वर्ष असून, बुधवार दि. १४ ऑक्टोबर ते शुक्रवार दि. १६ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत श्री सुंदर नारायण मंदिर, चौल नाका येथे कार्यक्रम होणार आहेत. बुधवार, दि. १४ ऑक्टोबर रोजी कार्यक्रमाची सुरुवात नवीन म्हात्रे लिखित 'प्राचीन चौल व्यापारी बंदराचा इतिहास' या पुस्तकाच्या प्रकाशनाने होणार आहे. चौलच्या ऐतिहासिक, पुरातत्त्वीय, वैज्ञानिक आणि सुरक्षाविषयक बाबींवर नागरिकांना माहिती मिळावी, या उद्देशाने विविध विषयांची निवड करण्यात आली आहे. सुंदर नारायण मंदिर, चौल नाका येथे होणाऱ्या या ज्ञानयज्ञ कार्यक्रमास सर्वांसाठी प्रवेश खुला आहे.








मुरूड : राजपुरी समुद्रकिनारा सायंकाळी अतिशय सुंदर दिसतो. समुद्राजवळील घरे आणि किनाऱ्यावरील बोटी सप्तरंगात न्हाऊन निघतात. त्याचे छायाचित्रकार सुधीर नाझरे यांनी टिपलेले विलोभनीय दृश्य.





















पनवेल : महापालिकेचे माजी सभागृहनेते तथा नगरसेवक परेश ठाकूर यांनी गुरुवारी परिसरातील गणरायांचे मनोभावे दर्शन घेतले. यावेळी त्यांनी सर्वांच्या सुख-समृद्धी, आरोग्य आणि मंगलमय जीवनासाठी बाप्पाच्या चरणी प्रार्थना केली.

# रायगड रस्ता पूर्ण झाल्यावर साइडपट्टीचे खोदकाम; महामार्ग बांधकाम विभागाची तक्रार

**महाड : प्रतिनिधी**
ऐतिहासिक किल्ले रायगडाकडे जाणाऱ्या मार्गाचे दुपदरीकरण पूर्ण झाले असताना महाराष्ट्र शासनाच्या महावितरण विभागाकडून आता केबल टाकण्यासाठी साईड पट्टीला खोदकाम सुरू केले आहे. हे खोदकाम यांत्रिक पद्धतीने होत असल्याने मूळ रस्त्याचे नुकसान होत असल्याची तक्रार महामार्ग बांधकाम विभागाने केली आहे.



ऐतिहासिक किल्ले रायगडचे संवर्धन करण्यासाठी शासनाने कोट्यावधी रुपये खर्च केले आहेत. त्यातीलच एक भाग म्हणून महाड रायगड रस्त्याचे दुपदरीकरण काम हातात घेण्यात आले. पूर्वी असलेल्या रस्त्यावर रायगडावरील विविध कार्यक्रमाच्या वेळी मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी आणि वाहन पार्किंगचा प्रश्न निर्माण होत होता. यामुळे या रस्त्याचे रुंदीकरण करण्याचे काम सुरू करण्यात आले होते.

महामार्ग बांधकाम विभागाच्या वतीने या रस्त्याचे काम होत असून या रस्त्याला NH-१६६F असे नामकरण झाले आहे. महाड - रायगड किल्ला (हिरकणीवाडी कनेक्टर ९५० मी. आणि जिजामाता समाधी कनेक्टर १२१३ मी. सह) 'पेव्हड शोल्डर्स' (paved shoulders) असलेल्या २ - लेन रस्त्यात पुनर्वसन आणि श्रेणीसुधारणा करण्याच्या उर्वरित कामाबाबत (एकूण लांबी - २५.६०९ किमी) EPC पद्धतीद्वारे. NH-१६६F (महाड - रायगड किल्ला) च्या 'राईट ऑफ वे' (RoW) मध्ये अनधिकृतपणे विद्युत केबल टाकण्याचे काम वीज मंडळाकडून सुरू आहे. सदर काम करताना महामार्ग बांधकाम विभागाची रितसर परवानगी घेतलेली नसल्याचे महामार्ग बांधकाम अधिकाऱ्यांनी सांगितले. यामुळे सदर काम त्वरित थांबवणे आणि आवश्यक परवानगी घेणे अशा प्रकारचे तक्रार वजा पत्र महावितरण ला देण्यात आलेले आहे.

महाड रायगड रस्त्याच्या साईड पट्टीला महावितरण विभागाकडून केबल टाकण्याचे काम सुरू केले आहे. केबल टाकताना महामार्ग विभागाच्या नियमांचे उल्लंघन झाले असल्याचे दिसून येत आहे. साईड पट्टीलाच खोदकाम होत असल्याने रस्त्याचे देखील नुकसान होत आहे. तसेच रस्त्याकडेला लावण्यात आलेल्या फलकांचे आणि रोपांचे देखील नुकसान होत आहे. याबाबत महामार्ग विभागाने हरकत घेतली आहे. मात्र तरीदेखील हे काम जोर जबरदस्तीने सुरूच आहे. आवश्यक कायदेशीर व विभागीय परवानग्या मिळेपर्यंत NH-१६६F च्या RoW मध्ये कोणतेही पुढील काम करू नये आणि राष्ट्रीय महामार्गाच्या रस्त्यांमध्ये युटिलिटी टाकण्याबाबतच्या लागू असलेल्या तरतुदी आणि मार्गदर्शक तत्त्वांनुसार, काम सुरू करण्यापूर्वी / पुन्हा सुरू करण्यापूर्वी विद्युत केबल टाकण्याचा प्रस्ताव सादर करावा आणि प्रादेशिक कार्यालय, MoRTH, नवी मुंबई यांच्याकडून पूर्व-लेखी परवानगी घ्यावी अशा प्रकारचे लेखी पत्र दिले आहे.

विभागीय अधिकाऱ्यांची मंजुरी/परवानगी मिळेपर्यंत सदर काम त्वरित थांबवावे आणि या कामासाठी कोणतीही यंत्रसामग्री, मजूर किंवा एजन्सी तैनात करू नये. अनधिकृत कामामुळे राष्ट्रीय महामार्गाच्या मालमत्तेचे काही नुकसान झाल्यास, त्याची जबाबदारी संबंधित एजन्सी/MSEDCL ची असेल आणि ते नुकसान त्यांच्या स्वतःच्या खर्चाने पूर्ववत करावे लागेल असे पत्राद्वारे सूचित केले आहे.

**“ नव्यानेच बांधलेल्या किल्ले रायगड महामार्ग लगत उत्खनन करून भूमिगत इलेक्ट्रिक केबल टाकण्याचे जे काम सुरू आहे त्या कामासंदर्भात मीहावितरण कंपनीचे उपकार्यकारी अधिकारी यांना विचारणा केली असता सदर कामाची मंजुरी ही केंद्र सरकारकडून असून आमचा त्यात कोणताही हस्तक्षेप नाही. केवळ या कामावर देखरेख करण्याचे काम आमच्याकडे असून, सदर ठेकेदाराने योग्य त्या परवानग्या घेऊनच काम करायचे आहे. याबाबत जिल्हाधिकारी यांनी या कामाच्या बाबत पत्रव्यवहार केला आहे.**

**- एस एम गढरी,**
**उप कार्यकारी अभियंता**
**महावितरण महाड**

## माणगाव पोलिसांची कारवाई; गावठी हातभट्टी दारूसह एक लाख ४२ हजारांचा मुद्देमाल जप्त

**माणगाव : बातमीदार**
माणगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीतील वावे दिवाळी, ता. माणगाव, जि. रायगड येथे पोलिसांनी मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार कारवाई करून गावठी हातभट्टी दारू तयार करण्यासाठी वापरले जाणारे साहित्य, तयार दारू, मोटारसायकल व मोबाईल असा एकूण १ लाख ४२ हजार ३०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.



या कारवाईत लक्ष्मण झिमाजी कोकरे (वय ३८, व्यवसाय शेती, रा. कारीवणे, पो. धाटाव, ता. रोहा, जि. रायगड) याच्यावर कारवाई करण्यात आली आहे. त्याच्याकडून तांदूळ ठेवण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या पिवळ्या रंगाच्या गोणीत काळ्या रंगाची रबरी ट्यूब व ट्यूबच्या दोन्ही बाजूस तोडदार रबरी पट्टीने बांधलेली गावठी हातभट्टीची दारू तयार करण्याची सामग्री आढळून आली. त्यामध्ये सुमारे २० लिटर गावठी हातभट्टीची तयार दारू व ट्यूबसह साहित्य जप्त करण्यात आले. तसेच दुसऱ्या निळ्या रंगाच्या गोणीतही अशाच प्रकारे गावठी दारू तयार करण्यासाठी वापरले जाणारे साहित्य आढळले. त्यामध्ये सुमारे ३३ लिटर गावठी हातभट्टीची तयार दारू जप्त करण्यात आली.पोलिसांनी या कारवाईत एक मोटारसायकल (नोंदणी क्रमांक MH-०६/CS/५४४०), तसेच व्हिवो कंपनीचा Y-११ 5G मोबाईल असा मुद्देमालही ताब्यात घेतला आहे. जप्त केलेल्या सर्व मुद्देमालाची एकूण किंमत १ लाख ४२ हजार ३०० रुपये असल्याचे नमूद करण्यात आले आहे. याप्रकरणी महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमातील कलम ६५(अ) व ६५(ई) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास माणगाव पोलीस करीत आहेत.



**खोपोली : सार्वजनिक गणेशोत्सव विसर्जन सोहळा मिरवणुकीत रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांनी भेट देऊन कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी आढावा घेतला आणि सर्व मंडळांना भेट दिली. यावेळी खोपोलीचे उपनगराध्यक्ष विक्रम साबळे यांच्या हस्ते त्यांचे शाल-श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.**

## बोर्ले गावात पुन्हा चार गुरांची चोरी; कत्तल करून मांस नेल्याचा संशय

**माणगावःबातमीदार,प्रतिनिधी**
माणगाव तालुक्यातील मोर्बा विभागातील बोर्ले गावात गुरे चोरीच्या घटनांनी शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. अवघ्या काही दिवसांतच पुन्हा चार गुरे चोरीला गेल्याची घटना समोर आली असून, त्यांची कत्तल करून मांस नेल्याचा संशय व्यक्त करण्यात येत आहे. वारंवार घडणाऱ्या या घटनांमुळे गुरे चोरणाऱ्या टोळीचा बंदोबस्त करण्याचे आव्हान माणगाव पोलिसांसमोर उभे राहिले आहे.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, १० सप्टेंबर रोजी बैलपोळ्याच्या दिवशी बोर्ले येथील बौद्धवाडीतील शेतकरी संदीप पवार यांची बैलगाडा शर्यतीतील सुमारे साडेतीन लाख रुपये किमतीची बैलजोडी चोरीला गेली होती. या बैलांची कत्तल करून मांस विक्री केल्याचा आरोप त्यावेळी करण्यात आला होता.ही घटना ताजी असतानाच २३ सप्टेंबर रोजी बोर्ले गावात पुन्हा चार गुरे चोरीला गेल्याचे समोर आले. गावालगत रहदारीच्या रस्त्याच्या कडेला नंदनवन हॉटेलजवळून संदीप पवार यांचा सुमारे ५० हजार रुपये किमतीचा बैल, हेमंत मोहिते यांचा ५० हजार रुपये किमतीचा बैल, शांताराम शिंदे यांची ३५ हजार रुपये किमतीची गाय आणि मारुती मोहिते यांची ५० हजार रुपये किमतीची गाभण गाय अशी चार गुरे चोरीला गेली.

या चारही गुरांची कत्तल करून मांस नेल्याचा संशय शेतकऱ्यांकडून व्यक्त करण्यात येत आहे. विशेष म्हणजे मारुती मोहिते यांची गाय गाभण होती. येत्या काही दिवसांत ती व्यायची होती. मात्र, तिचीही कत्तल झाल्याचा आरोप असून, तिच्या पोटातील वासरू फेकून दिल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले. या प्रकारामुळे परिसरातील नागरिक व शेतकऱ्यांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.

घटनेची माहिती मिळाल्यानंतर माणगाव पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक मारुती आंधळे यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. अज्ञात आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहिता (BNS) २०२३ मधील कलम ३०३(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस सागर जाधव करीत आहेत.

## पोलादपूरमध्ये श्री स्वामी समर्थ मंदिराचा प्राणप्रतिष्ठा व कलशारोहण सोहळा

### पालकमंत्री भरत गोगावले यांच्या हस्ते मंदिराचे लोकार्पण

**पोलादपूर : प्रतिनिधी**
मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गालगत निसर्गरम्य वातावरणात नव्याने उभारण्यात आलेल्या स्वराज कॉम्प्लेक्स येथे श्रीस्वामी समर्थ मंदिराचा प्राणप्रतिष्ठा व कलशारोहण सोहळा गुरुवारी पार पडला. यावेळी रायगड जिल्ह्याचे पालकमंत्री तथा राज्याचे रोहयो खारजमीन विकास आणि फलोद्यान मंत्री भरत गोगावले यांच्याहस्ते श्री स्वामी समर्थ मंदिराचे लोकार्पण करण्यात आले.

याप्रसंगी मंत्री गोगावले यांच्यासोबत रायगड जिल्हा परिषदेचे शिक्षण अर्थ व क्रीडा सभापती चंद्रकांत कळंबे, तालुकाप्रमुख निलेश अहिरे, कृऊबा समिती संचालक लक्ष्मण मोरे, विभागप्रमुख सतीश शिंदे, उद्योजक रामदास कळंबे, राजमुद्राचे उद्योजक सुनील मोरे तसेच अमी कन्स्ट्रक्शनचे प्रमुख मोदी आणि मॅनेजिंग डायरेक्टर संदीप पालकर आदींसह म्हाडा संलग्न स्वराज कॉम्प्लेक्सचे सदनिकाधारक रहिवासी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्राणप्रतिष्ठा सोहळ्यानिमित्त विविध धार्मिक विधी, मंत्रोच्चार आणि पूजाविधी पार पडले. यामुळे संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने भारावून गेला होता.यावेळी मंत्री भरतशेठ गोगावले यांनी, स्वराज कॉम्प्लेक्समध्ये साकारलेल्या श्री स्वामी समर्थ मंदिरामुळे परिसराच्या वैभवात भर पडल्याने या माध्यमातून नागरिकांना आध्यात्मिक समाधान व भक्तीचा अनुभव मिळेल, असा विश्वास देखील व्यक्त केला.



## सारळ समुद्रकिनारी विसर्जित न झालेल्या मूर्तींचे होडीमधून पुन्हा खोल समुद्रात विसर्जन

**अलिबागः प्रतिनिधी**
अनंत चतुर्दशीच्या गणरायाला भाविकांनी नदी, तलाव, समुद्रात विसर्जीत करून भावपूर्ण निरोप दिला. पण बऱ्याच वेळा मूर्तीचे विसर्जन होत नाही, त्या किनाऱ्यावर भग्न अवस्थेत पहायला मिळतात. अलिबाग तालुक्यातील सारळ समुद्रकिनारी झालेल्या गणेश मूर्ती विसर्जनानंतर शनिवारी मोठ्या संख्येने गणेश मूर्ती किनाऱ्यावर पहायला मिळाल्या. बोडणी येथील अमर नाखवा हे दरवर्षी अशा विसर्जित न झालेल्या मूर्ती होडी



मधून पुन्हा खोल समुद्रात विसर्जीत करण्याचे कार्य करीत असतात.

शानिवारी सकाळी लाईफ संस्था, सारळ हायस्कूलचे मुख्याध्यापक जगदीश पाटील, शालेय विद्यार्थी, कोळी बांधव, वनअधिकारी, निवृत्त नायब तहसीलदार रवींद्र पाटील यांच्या पुढाकाराने समुद्रकिनारी स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. किनाऱ्यावरील कचरा गोळा करण्यात आला. तर गणेश मूर्ती विसर्जनासाठी होडी मधून पुन्हा खोल समुद्रात नेऊन विसर्जित करण्यात आल्या. या उपक्रमाचे कौतुक होत आहे.

विसर्जन स्थळी दरवर्षी विसर्जनाच्या दुसऱ्या दिवशी मूर्तीची भग्नावस्था पहायला मिळते. ज्या मूर्तीमध्ये भाविक देव पहातात, त्याच मूर्ती किनाऱ्यावर अस्ताव्यस्थ पडलेल्या असतात. एक तर त्या खोल पाण्यात नेऊन विसर्जित करण्यात याव्यात.

दरम्यान स्थानिक प्रशासनाने देखील पुढाकार घेऊन उपाययोजना करणे आवश्यक आहे. मूर्तीची होणारी विटंबना थांबवायची असेल तर मूर्तीचे विसर्जन खोल पाण्यात करावे अशी प्रतिक्रिया व्यक्त होत आहे.

अमर नाखवा यांच्या सारखा सामाजिक जाण असलेला तरुण दरवर्षी हा स्तुत्य उपक्रम राबवत आहे. या वर्षी त्याला शालेय विद्यार्थी, वनअधिकारी, सामाजिक संस्था यांची साथ मिळाली.

## गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या, गजरात अनंत चतुर्दशीला गणरायांचे विसर्जन



**माणगाव : : प्रतिनिधी**
गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या, गणपती गेले गावाला चैन पडे ना आम्हाला च्या गजरात माणगावसह तालुक्यातील बारा दिवसाच्या १३ सार्वजनिक व ७४१ घरगुती गणपतींना भावपूर्ण निरोप देत गणपतींचे उत्साहात विसर्जन करण्यात आले. तालुक्यात ग्रामीण भागातील श्री गणेश मित्रमंडळ पवारवाडी - सुर्ले यांचा गणेशोत्सव माणगाव तालुक्यात विशेष आकर्षण ठरला. त्याचबरोबर माणगाव नगरीतील साईनगरचा राजा,जयहनुमान मित्रमंडळ उतेखोलवाडी,एकलव्य मित्रमंडळ नाणोरे आदिवासीवाडी,ढालघरचा राजा यांच्या भव्य मिरवणुकांनी गणेश भक्तांचे लक्ष वेधले होते.

माणगावसह तालुक्यात सोमवार दि.१४ सप्टेंबर रोजी गणरायांचे वाजत- गाजत उत्साहात आगमन झाल्यावर शुक्रवार दि. २५ सप्टेंबर रोजी अनंत चतुर्थी दिवशी दुपार पासूनच विविध सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी व गणेश भक्तांनी आपले दहा दिवसांचे सार्वजनिक गणपती व घरगुती गणपती विसर्जनासाठी बाहेर काढले. तालुक्यातील ग्रामीण भागातील मोर्बा विभागातील श्री गणेश मित्रमंडळ पवारवाडी - सुर्ले यांच्या गणेशोत्सवाचा पवारवाडीच्या राजाचे रात्री ९ वा. मोर्बा येथील काळनदीत उत्साहात विसर्जन करण्यात आले.

माणगावातील साईनगराचा राजा,जय हनुमान मित्र मंडळ उतेखोलवाडीचा गणराय,एकलव्य मित्रमंडळ नाणोरे आदिवासीवाडीचा गणराय,माणगाव बसस्थानकातील गणराय, ढालघरचा राजा हे एक आकर्षण होते. विविध मंडळातील तसेच घरगुती गणरायांच्या पुरुष व महिला गणेशभक्त डीजे च्या आवाजात नाचत मिरवणुकीत मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. यावेळी माणगाव नगरपंचायतीतर्फे तसेच पोलीस ठाण्यातर्फे गणेश भक्तांचे स्वागत करण्यात आले.

नगरपंचायतीतर्फे गणेश भक्तांना पर्यावरण पूरक गणेशोत्सव अंतर्गत कृत्रिम विसर्जन तलावाचा उपयोग करून पर्यावरणाचे रक्षण करा,माझी वसुंधरा, स्वच्छ सर्वेक्षण कार्यक्रमांतर्गत निर्माल्य येथे टाकावे. असा संदेश असा संदेश देण्यात आला होता.

## आदिवासी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक ते प्रयत्न करणार -अध्यक्ष मंगेश वाकडीकर

**चौक : प्रतिनिधी**
आदिवासी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक ते प्रयत्न पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या जनमन योजनेअंतर्गत करण्यात येतील यासाठी राज्य सरकार व रायगड जिल्हा परिषद यांच्या कडून सर्व प्रकारची मदत करण्यात येईल असे आश्वासन रायगड जिल्हा परिषदेचे अध्यक्ष मंगेश वाकडीकर यांनी दिले आहे.खालापूर तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत चौक हद्दीतील नानिवली येथे पीएम जनमन योजने अंतर्गत विद्यार्थी वसतिगृहाचे भूमिपूजन करताना अध्यक्ष मंगेश वाकडीकर बोलत होते.



पीएम-जनमन' म्हणजेच प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय महाअभियान ही केंद्र सरकारची अत्यंत महत्त्वाची योजना आहे. देशातील अत्यंत मागासलेल्या आदिवासी जमातींचा सामाजिक आणि आर्थिक विकास करणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे.या अभियानांतर्गत एकूण ११ महत्त्वाच्या सुविधा पुरवल्या जात असून, त्यापैकी वसतिगृह उभारणी हा शिक्षणाला चालना देणारा एक प्रमुख भाग आहे. पीएम-जनमन वसतिगृह आदिवासी भागातील मुला-मुलींना शिक्षणासाठी सोयीचे व्हावे म्हणून या योजने अंतर्गत निवासी वसतिगृहांची निर्मिती करण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे. अत्यंत दुर्गम आणि आदिवासी भागात राहणाऱ्या विद्यार्थ्यांना राहण्याची आणि जेवणाची मोफत सोय उपलब्ध करून देणे, जेणेकरून पैशांअभावी किंवा दुर्गम,दुर्लक्षित अणि प्रवासाच्या अंतरामुळे त्यांचे शिक्षण सुटणार नाही. शिक्षणा मुळे आदिवासी विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला बळ मिळाले आहे.

सरपंचरितू ठोंबरे, भाजप उत्तर रायगड उपाध्यक्ष सुधीरशेठ ठोंबरे,माजी जिल्हा परिषद सदस्य मोतीराम ठोंबरे, उपसरपंच सौ. वृषाली अंबवणे, जि.प. सदस्या सौ. वैशाली खैर, पं.स. सदस्या कमल भस्मा, प्रमिला पाटील, ग्रा.पं. सदस्य नयना झिंगे, सुभाष पवार, अश्विनी म्हात्रे, महादेव पिरकड, लक्ष्मी वाघ, तालुका आदिवासी संघटना अध्यक्ष अंकुश वाघ,विस्तार अधिकारी विनोद चांदोरकर, वरिष्ठ विस्तार अधिकारी शिक्षण शिल्पा दास, कनिष्ठ विस्तार अधिकारी देवीदास पाडवी, समग्र शिक्षा अभियानाचे कनिष्ठ अभियंता आशिष ठाकूर,ग्राम पंचायत अधिकारी गणेश मोरे यांच्यासह ग्रामस्थ व आदिवासी समाज बांधवांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# कबड्डीत भारताच्या लेकींचा धुमाकूळ

## इराणला हरवून मिळविले सुवर्णपदक



**जपान : वृत्तसंस्था**

भारताने यंदाच्या आशियाई क्रीडा स्पर्धेत तिसरे सुवर्णपदक जिंकले आहे. सुवर्णपदकाच्या लढतीत इराणचा ३७-३४ असा पराभव करून भारतीय महिला कबड्डी संघाने इतिहास रचला. या सामन्यात दोन्ही संघांमध्ये अटीतटीची लढत पाहायला मिळाली. यंदाच्या आशियाई क्रीडा स्पर्धा सुरू होण्यापूर्वीच भारतीय महिला कबड्डी संघाला सुवर्णपदकाचा प्रबळ दावेदार मानले जात होते. अंतिम सामन्यापर्यंतच्या संपूर्ण स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करत संघाने या अपेक्षा पूर्ण केल्या.

गट फेरीत भारतीय संघाने एकतर्फी वर्चस्व गाजवले आणि उपांत्य सामना सहज जिंकला. मात्र, सुवर्णपदकाच्या लढतीत इराणने कडवी झुंज दिली.सामन्यात भारतीय संघाने पहिल्या सत्रापासूनच आघाडी कायम राखली. पहिल्या सत्रात एका टप्प्यावर गुणसंख्या ७-७ अशी बरोबरीत होती. त्यानंतर भारतीय संघाने आक्रमक खेळ केला.

सत्राच्या अखेरीस इराणला ऑल आऊट केले आणि २२-१६ अशी आघाडी घेतली. सुवर्णपदकाच्या सामन्याचे दुसरे सत्रही तितकेच रोमांचक होते. इराणच्या संघाने जोरदार पुनरागमन करत भारताला ऑल आऊट केले आणि आघाडी कमी केली. मात्र, भारतीय संघाने दमदार पुनरागमन करत प्रत्युत्तरात इराणला ऑल आऊट केले आणि सामन्याच्या अखेरीस आपली आघाडी कायम राखली. अखेरीस भारताने हा सामना ३७-३४ असा जिंकून महिला कबड्डीचे सुवर्णपदक आपल्या नावे केले.

# ४४ वर्षांनंतर मॅरेथॉनमध्ये भारताला पदक

## ■ सवान बरवालला रौप्य



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आशियाई क्रीडा स्पर्धेत शनिवारची सुरुवात भारतासाठी ऐतिहासिक ठरली. मॅरेथॉन शर्यतीत सवान बरवालने रौप्यपदकाची कमाई केली. १९८२ नंतर म्हणजेच तब्बल ४४ वर्षांनंतर मॅरेथॉन शर्यतीत भारतीय ॲथलिटने पदक पटकावण्याची किमया केली आहे. जपानच्या यामाशिताने सुवर्णपदकावर नाव कोरले. याआधी १९५१ मध्ये झालेल्या स्पर्धेत मॅरेथॉन शर्यतीत छोटा सिंग यांनी सुवर्णपदकावर कब्जा केला होता.

भारताच्याच सुरत सिंग माथूर यांनी कांस्यपदक जिंकले होते. यानंतर थेट १९८२ मध्ये होसूर कुकप्पा सीथारन यांनी कांस्यपदकावर नाव कोरले होते. त्यानंतर एवढी वर्षे भारतीय खेळाडू शर्यतीत पदकापासून वंचित राहिले होते.पदकाचा दुष्काळ सवान बरवालने संपवला आहे. त्याने ही शर्यत २ तास ११ मिनिटे आणि ३७ सेकंदांत पूर्ण केली. शुक्रवारी भारतीय खेळाडूंनी १ सुवर्ण, २ रौप्य आणि ३ कांस्यपदकांची कमाई केली.

# `सीकेटी'चे स्पर्धक बॉक्सिंग स्पर्धेत चमकले

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

क्रीडा व युवक संचालनालय पुणे महाराष्ट्र राज्य आणि रायगड जिल्हा क्रीडा कार्यालय व पनवेल महानगरपालिका आयोजित दि. २२ ते २३ सप्टेंबर रोजी रामशेठ ठाकूर ज्युनिअर कॉलेज, खारघर येथे झालेल्या जिल्हास्तरीय बॉक्सिंग स्पर्धेत नवीन पनवेलमधील चांगू काना ठाकूर उच्च माध्यमिक(सीकेटी) विद्यालयातील निकिता राजेश नाईक (इ. १२वी ) व स्वस्तिक सतीश भोसले (इ. ११वी ) यांनी प्रथम क्रमांक प्राप्त केला. त्यांची धारावी स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स येथे होणाऱ्या विभागीय बॉक्सिंग स्पर्धेसाठी निवड झाली आहे.



पार्थ रामचंद्र पाटील (इ. १२वी) याने द्वितीय क्रमांक, तर कुमारन एलुमलाई वननियर (इ. ११वी) व समीक्षा संदीप पिंपळे (इ. ११वी) यांनी तृतीय क्रमांक प्राप्त केला आहे. या सर्व खेळाडूंना क्रीडा शिक्षक अरुण पाटील, मनोज पाटील व माधवी कोळी यांचे मार्गदर्शन लाभले. क्रीडा खेळाडूंनी मिळविलेल्या यशाबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, अध्यक्ष अरुणशेठ भगत, सचिव डॉ. एस. टी. गडदे, प्राचार्य प्रशांत मोरे, पर्यवेक्षक अजित सोनवणे, पर्यवेक्षिका स्वाती पाटील तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी या सर्वांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# ऑस्ट्रेलियावर भारताचा ऐतिहासिक विजय



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारत अ आणि ऑस्ट्रेलिया अ या दोन्ही संघांमध्ये झालेल्या सामन्यात भारतीय संघाने सर्वांत मोठ्या आव्हानाचा पाठलाग करून ऐतिहासिक विजयाची नोंद केली. ऑस्ट्रेलिया ए चा महिला संघ सध्या भारत दौऱ्यावर आहे. दोन्ही संघांमध्ये थरारक सामना पाहायला मिळाला.

मालिकेतील तिसऱ्या सामन्यात पहिल्या डावात फलंदाजी करताना ऑस्ट्रेलिया ए संघाने ९ बाद ३६२ धावा केल्या होत्या. या धावांचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या भारत अ संघाने हे आव्हान ४८.२ षटकांत पूर्ण केले आणि दणदणीत विजयाची नोंद केली. धावांचा पाठलाग करताना मिन्नू मनीने अवघ्या ५५ चेंडूंत नाबाद ८८ धावांची खेळी केली. भारतीय संघाकडून एकाही फलंदाजाने शतक झळकावले नाही, तरीही संघाने सर्वांत मोठ्या आव्हानाचा यशस्वी पाठलाग केला. या सामन्यात ऑस्ट्रेलिया ए संघाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करताना ऑस्ट्रेलिया ए संघाने ९ बाद ३६२ धावांचा डोंगर उभारला. ऑस्ट्रेलियाकडून चार्ली नॉटने सर्वाधिक १०९ धावांची खेळी केली. तिला कोर्टनी वेबने चांगली साथ दिली. दोघींनी मिळून महत्त्वपूर्ण भागीदारी केली. वेबने ९५ धावांची खेळी केली. तिचे शतक अवघ्या ५ धावांनी हुकले.

दोघींनी चौथ्या विकेटसाठी १६६ धावांची भागीदारी केली. भारतीय संघाकडून गोलंदाजी करताना वैष्णवी शर्माने ४८ धावा खर्च करून ४ गडी बाद केले, तर निक्की प्रसादने ८४ धावा खर्च करून ४ गडी बाद केले. भारतीय महिला अ संघ ३६३ धावांच्या भल्यामोठ्या आव्हानाचा पाठलाग करण्यासाठी मैदानात उतरला होता. हे आव्हान मुळीच सोपे नव्हते.

# आशियाई स्पर्धेत महिला नेमबाजांचा पराक्रम



**नागोया : वृत्तसंस्था**

आशियाई क्रीडा स्पर्धा २०२६ मध्ये भारताच्या महिला नेमबाजांनी पुन्हा एकदा तिरंगा फडकवला आहे. महिलांच्या ५० मीटर रायफल ३ पोझिशन सांघिक प्रकारात भारतीय संघाने अत्यंत अटीतटीच्या लढतीत रौप्यपदक पटकावले आहे. चीनने या प्रकारात सुवर्णपदक आपल्या नावावर केले, तर भारतीय मुलींच्या अचूक निशाण्याने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. तिलोत्तमा सेन, विदर्सा के. विनोद आणि आशी चौकसे या त्रिकुटाने या सांघिक प्रकारात एकूण १७६३-९० अशी दमदार एकत्रित गुणसंख्या नोंदवली.

या तिघींच्या चमकदार कामगिरीमुळे भारताला दुसरे स्थान मिळवणे शक्य झाले. या सांघिक प्रकारात तिलोत्तमा सेन हिने सर्वाधिक ५९० गुण मिळवत संघासाठी सर्वोत्तम कामगिरी केली. तिच्यापाठोपाठ विदर्सा के. विनोद हिने ५८८ गुण, तर आशी चौकसे हिने ५८५ गुणांची कमाई केली. फक्त सांघिक प्रकारातच नव्हे, तर वैयक्तिक पात्रता फेरीतही भारतीय नेमबाजांनी अप्रतिम खेळ दाखवला. तिलोत्तमा सेन आणि विदर्सा के. विनोद यांनी अनुक्रमे तिसरे आणि सहावे स्थान पटकावत थेट अंतिम फेरीत दिमाखात प्रवेश केला आहे. तिलोत्तमा सेनने गुडघ्यावर बसून १९७, पोटावर झोपून १९९ आणि उभे राहून १९६ असे एकूण ५९० गुण मिळवले.

# उपांत्यपूर्व फेरीत भारताची अफगाणिस्तानशी टक्कर

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आशियाई क्रीडा स्पर्धेत सुवर्णपदक जिंकण्यासाठी भारतीय संघ पूर्णपणे सज्ज आहे. श्रेयस अय्यरच्या नेतृत्वाखाली भारतीय संघ उपांत्यपूर्व सामना २८ सप्टेंबर रोजी खेळणार आहे. सुरुवातीला भारताचा प्रतिस्पर्धी निश्चित नव्हता, मात्र नेपाळ आणि जपान यांच्यातील सामना पावसामुळे रद्द झाल्यानंतर चित्र स्पष्ट झाले. आता अधिकृतपणे जाहीर करण्यात आले आहे की, उपांत्यपूर्व फेरीत भारतीय संघाचा सामना अफगाणिस्तानशी होईल.

सीडिंगच्या आधारे भारत, पाकिस्तान, श्रीलंका आणि बांगलादेश यांनी उपांत्यपूर्व फेरीत थेट प्रवेश मिळवला आहे. दरम्यान, अफगाणिस्तान, नेपाळ, जपान, मलेशिया आणि हाँगकाँग यांसारख्या संघांनी उपांत्यपूर्व फेरीतील स्थान निश्चित करण्यासाठी स्पर्धा केली. गट अ मधील सर्व सामने पार पडले आहेत. या गटात अफगाणिस्तान, नेपाळ आणि जपान यांचा समावेश होता. नेपाळ आणि जपान यांच्यातील अंतिम साखळी सामना पावसामुळे होऊ शकला नाही. परिणामी, दोन्ही संघांना प्रत्येकी एक गुण देण्यात आला.नेपाळने यापूर्वी अफगाणिस्तानचा पराभव केला होता, त्यामुळे त्यांची एकूण गुणसंख्या तीन झाली.

गट अ मध्ये अव्वल स्थान पटकावून नेपाळने उपांत्यपूर्व फेरीतील स्थान निश्चित केले. प्रत्येक गटातून दोन संघ उपांत्यपूर्व फेरीसाठी पात्र ठरतात आणि गट अ मधून पात्र ठरणारा अफगाणिस्तान हा दुसरा संघ ठरला आहे. आता हे निश्चित झाले आहे की उपांत्यपूर्व फेरीत श्रीलंकेचा सामना नेपाळशी होईल, तर भारतीय संघ अफगाणिस्तानशी भिडणार आहे.




सौजन्य : अमित जाधव (जिल्हाध्यक्ष, अनुसूचित जाती मोर्चा उत्तर रायगड जिल्हा), प्राची अमित जाधव (सदस्य, रायगड जिल्हा परिषद)


# वेस्ट इंडिज क्रिकेटवर आर्थिक संकट; खेळाडूंच्या पगारात कपात

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

वेस्ट इंडिजचा पुरुष क्रिकेट संघ सध्या भारताच्या दौऱ्यावर आहे. दोन्ही संघ रविवारपासून (२७ सप्टेंबर) तीन सामन्यांची एकदिवसीय मालिका खेळणार आहेत. अशातच क्रिकेट वेस्ट इंडिजच्या आर्थिक संकटाबाबत एक मोठी आणि धक्कादायक माहिती समोर आली आहे. त्यामुळे खेळाडूंच्या पगारात कपात झाली आहे. त्याचबरोबर स्पर्धाही रद्द करण्यात आली आहे. क्रिकेट वेस्ट इंडिजने या आर्थिक संकटाचा सामना करण्यासाठी काही उपाययोजना आखल्या आहेत.



यामध्ये आंतरराष्ट्रीय खेळाडूंच्या मानधनात २५ टक्के कपात आणि २०२६ हंगामाची पुरुषांची सुपर ५०, महिलांची टी-२० ब्लेझ स्पर्धा रद्द करण्याच्या निर्णयाचा समावेश आहे. आंतरराष्ट्रीय खेळाडूंसोबत १२ महिन्यांचे करार केले जातात आणि त्याप्रमाणे मानधन दिले जाते, मात्र त्या मानधनात २५ टक्के कपात करण्यात आली आहे. तसेच देशांतर्गत क्रिकेटपटूंच्या कराराचा कालावधी सात महिन्यांचा करण्यात आला आहे. मंडळाने खर्च कमी करण्यासाठी आणि आर्थिक संकटावर मात करण्यासाठी यंदाच्या पुरुषांची सुपर ५० आणि महिलांची टी-२० ब्लेझ स्पर्धा रद्द केल्या आहेत. क्रिकेट वेस्ट इंडिजचे मुख्य कार्यकारी ख्रिस डेहरिंग म्हणाले, वेस्ट इंडिज प्लेयर्स असोसिएशन आणि खेळाडूंनी दाखवलेल्या सहकार्याच्या भावनेबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत, ज्यांनी आपण सर्व ज्या परिस्थितीचा सामना करत आहोत त्याबद्दल पूर्ण समज दाखवली आहे. ही परिस्थिती आदर्श नसली तरी आर्थिक स्थैर्याच्या दिशेने हे एक आवश्यक पाऊल आहे.

आंतरराष्ट्रीय रिटेनर करार १२ महिन्यांचेच राहतील, परंतु रिटेनर शुल्कामध्ये २५ टक्के कपात केली जाईल, असेही डेहरिंग यांनी निवेदनात म्हटले आहे.खरं तर, गेल्या १५ वर्षांत क्रिकेट वेस्ट इंडिजने देशांतर्गत विमान कंपन्यांवर ऐंशी दशलक्ष अमेरिकन डॉलर्सहून अधिक खर्च केला आहे, पण त्या लाभार्थ्यांकडून प्रायोजकत्वाच्या रूपात एक डॉलरही परत मिळालेला नाही. अनेक वर्षे हा भार उचलल्यामुळे निर्माण झालेली तात्काळ पैशांची अडचण आणि त्यातून उद्भवणाऱ्या गंभीर आर्थिक नुकसानीचाही आम्हाला सामना करावा लागेल, असे डेहरिंग म्हणाले आहेत. दरम्यान, सध्या पुरुष क्रिकेट संघाचे संपूर्ण लक्ष २०२७च्या विश्वचषक पात्रतेवर आहे.


# कारकिर्दीतील शेवटच्या विश्वचषकासाठी कोहली सज्ज



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारत आणि वेस्ट इंडिज यांच्यातील तीन सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेला २७ सप्टेंबरपासून सुरुवात होत आहे. या मालिकेत सर्वांचे लक्ष विराट कोहलीवर असणार आहे. कारकिर्दीच्या अंतिम टप्प्यात असूनही त्याच्या कामगिरीचा वेग मंदावलेला नाही. २०२७ चा विश्वचषक जिंकणे हेच अंतिम ध्येय असल्याचे त्याने स्पष्ट केले आहे.भारताचा दिग्गज फलंदाज विराट कोहलीने स्पष्ट केले की, आगामी आयसीसी पुरुष क्रिकेट विश्वचषक २०२७ हा भारताकडून खेळणारा त्याचा शेवटचा एकदिवसीय विश्वचषक असेल आणि तो जिंकण्यासाठी सर्वस्व पणाला लावण्याची तयारी त्याने दर्शवली आहे.

तो म्हणाला, माझ्यासाठी २०२७ चा विश्वचषक भारताकडून खेळणारा शेवटचा असेल आणि हीच माझी प्रेरणा आहे. सर्वस्व पणाला लावण्याचा माझा प्रयत्न असेल. विश्वचषक जिंकणे हेच आमचे ध्येय आहे आणि त्यासाठी जे काही करावे लागेल, त्यासाठी मी पूर्णपणे तयार आहे.लवकरच ३८ वर्षांचा होणारा विराट केवळ एकदिवसीय सामने खेळतो. त्याने कसोटी आणि टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेतली आहे. त्याने शेवटच्या १० एकदिवसीय सामन्यांत अप्रतिम कामगिरी केली आहे. दरम्यान, या सामन्यांमध्ये त्याने तीन शतके, एका सामन्यात ९० पेक्षा अधिक धावा आणि चार अर्धशतके झळकावली आहेत. विराटने खेळाच्या बदलत्या पद्धतीबाबतही भाष्य केले. तो म्हणाला की, खेळाची पद्धत आता बदलत आहे.


॥ दैनंदिन कार्यक्रम ॥
॥ भजनरुपी श्रध्दांजली सायंकाळी ०६.३० ते ०८.०० वाजता ॥

रविवार २७ सप्टेंबर २०२६ — श्री हनुमान प्रासादिक भजन मंडळ-रिटघर
बुवाः श्री. कुंडलिक पाटील, श्री. नंदु भोपी, श्री. गणू भोपी,
पखवाजः श्री. शालिक भोपी, श्री. विठ्ठल भोपी

सोमवार २८ सप्टेंबर २०२६ — श्री गुरुकृपा प्रासादिक भजन मंडळ-कोपर(गव्हाण)
गायिकाः सौ. सुप्रिया घरत (खारकोपर),पखवाजः श्री. तुषार घरत (चिर्ले),
तबलाः ॲड. मिलिंद कडू (खारघर)

मंगळवार २९ सप्टेंबर २०२६ — श्री ज्ञानाई सांस्कृतिक भजन मंडळ-शहाबाज
बुवाः ह.भ.प. भजनरत्न महादेव बुवा शहाबाजकर, कु. गंधर्व बुवा शहाबाजकर,
मृदंगमणीः श्री. दर्शन नाईक, तबलाः श्री. गौरव म्हात्रे

बुधवार ३० सप्टेंबर २०२६ — श्री हनुमान प्रासादिक भजन मंडळ-खारघर
गायकः श्री. अमित बुवा पाटील, संगीतरत्न श्री. पद्माकर बुवा पाटील, पं. श्री. ओमजी बोंगाने यांचे शिष्य, पखवाजः श्री. गोरखनाथ पाटील (खारघर), तबलाः कु. भुषण गायकर (घणसोली)

गुरुवार ०१ ऑक्टोबर २०२६ — दत्तू पेंटर आर्टचे कुलस्वामिनी संगीत साज-खोपटे(म्हात्रेपाडा)
गायक : कु. नचिकेत म्हात्रे, तबलाः कु. कुणाल पाटील (विंधणे),
पखवाजः कु. प्रथमेश पाटील (दिघोडे), निर्माताः कु. प्रथमेश सदानंद म्हात्रे


दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com